RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि.२० जानेवारी २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## मनोज जरांगे हजारो मराठा आंदोलकांसह अंतरवाली सराटीतून मुंबईकडे रवाना

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक जालना**

मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी कोट्यामधून आरक्षण द्यावे, या मागणीसाठी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. दरम्यान, मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी तीव्र आंदोलन छेडण्याच्या दिलेल्या इशाऱ्यानुसार आज जरांगे पाटील हे हजारो मराठा आंदोलकांसह आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथून मुंबईकडे रवाना झाले आहेत. हे आंदोलक मजल दरमजल करत २६ जानेवारी रोजी मुंबईत दाखल होणार आहेत. तसेच मनोज जरांगे पाटील हे २६ जानेवारीपासून मराठा आरक्षणासाठी आमरण उपोषण करणार आहेत.



मनोज जरांगे पाटील यांच्यासह मुंबईकडे निघालेल्या मराठा आंदोलकांचा प्रवास पुढीलप्रमाणे असेल. आज अंतरवाली सराटीतून रवाना झालेले मराठा समाजातील आंदोलक हे आज रात्री मातोरी, ता. शिरूर येथे मुक्काम करणार आहेत. तर २१ तारखेला मराठा आंदोलक दुपारी पाथर्डी तालुक्यातील तनपूरवाडी येथे भोजन करतील. तर रात्रीचा मुक्काम हा करंजी घाटातील बाराबाभली येथे असेल. २२ जानेवारीला हा मोर्चा भोजनासाठी दुपारी सुपा येथे थांबेल. तर मराठा आंदोलकांचा रात्रीचा मुक्काम रांजणगाव गणपती येथे असेल. २३ जानेवारी रोजी दुपारपर्यंत मराठा आंदोलक हे कोरेगाव भीमा येथे पोहोचतील. त्यानंतर या सर्वांचा रात्रीचा मुक्काम हा चंदननगर येथे असेल. २४ तारखेला हे आंदोलक पुण्यात पोहोचतील. तर रात्रीचा मुक्काम लोणावळा येथे करण्याचे नियोजित करण्यात आले आहे. २५ जानेवारी रोजी हे आंदोलक घाट उतरून पनवेल येथे दाखल होतील. तर रात्री वाशी येथे मुक्काम करतील. २६ जानेवारी रोजी मनोज जरांगे पाटील यांच्यासह सर्व मराठा आंदोलक मुंबईत चेंबूर येथून पदयात्रेद्वारे हे सर्वजण आझाद मैदान किंवा शिवाजी पार्क येथे दाखल होतील.

आंदोलनाला रवाना होण्यापूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला भावूक होत आवाहन केलं आहे. ते म्हणाले की,''माझं मराठ्यांना शेवटच सांगणं आहे मी तुमच्यात असेन नसेन मला माहित नाही, मराठ्यांची ही एकजुट फुटू द्यायची नाही. आरक्षण घेतल्याशिवाय आपण मागे हटायचं नाही. आपल्या मुलांना संपवण्याचा घाट का घातला आहे. आपली मुलं संपली पाहिजेत, अस त्यांना वाटत आहे, आमचं आंदोलन हे सहज घेत आहेत. आमच्या नोंदी सापडूनही हे आरक्षण देत नाहीत, असं जरांगे पाटील म्हणाले.

## भारत-म्यानमार सीमेवरील मुक्तसंचार बंद, कुंपण करणार

### गृहमंत्री अमित शाहांची मोठी घोषणा

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक नवी दिल्ली**

म्यानमार सिमा अधिक सुरक्षीत करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. म्यानमारच्या सीमेवर आता फेन्सिंग करण्यात येणार आहे. म्हणजेच म्यॅनमार सीमेवर बांगलादेशच्या सीमेप्रमाणे तारेचं कुंपण घालण्यात येणार आहे. त्याशिवाय ये जा ही परवानगीशिवाय होणार नाही, असे अमित शाह यांनी सांगितलं. म्यानमारचे ६०० सैनिकांनी आणि लोकांनी मिझोराममध्ये घुसखोरी केली, यावर आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह बोलत होते.



मागील काही दिवसांपासून भारत आणि म्यानमार यांच्यातील सीमावाद उफाळला होता. सीमारेषावर तणावाचं वातावरण होतं. म्यानमारमधून घूसखोरी केली जात असल्याचे अनेकदा समोर आले होते. त्यामुळे केंद्र सरकारनं मोठं पाऊल उचलले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज मोठी घोषणा केली. म्यानमार सीमेवरील मोफत ये जा यापुढे बंद करण्यात येणार आहे. त्याशिवाय सीमेवर तारेचं कुंपण घातलं जाणार आहे. बांगलादेश सीमाप्रमाणेच आता म्यॅनमारचीही सीमा अधिक सुरक्षित करण्यात येणार आहे.

## शाळांमध्येही रामनामाचा जयघोष, विवेकानंद विद्यालयातील ५०० विद्यार्थ्यांनी साकारले 'श्रीराम'

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक यवतमाळ**

अयोध्येतील राम जन्मभूमीवरील भगवान श्रीरामांच्या भव्य मंदिराचे लोकार्पण व रामललांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर देशभर वातावरण राममय झाले आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. शाळा, महाविद्यालये, विविध प्रतिष्ठाने, संस्था संघटना सर्वांमध्येच श्रीरामांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच्या निमित्ताने उत्साहाचे वातावरण आहे. या पृष्ठभूमीवर विशुद्ध विद्यालय द्वारा संचालित



विवेकानंद विद्यालयातील ५०० विद्यार्थ्यांनी 'श्रीराम' अक्षरे साकारून शाळाही राममय केली.

प्राणप्रतिष्ठेला दीप प्रज्ज्वलित करावे या पंतप्रधानांच्या आवाहनास प्रतिसाद देत विद्यार्थिनींनी दिव्यांची प्रतिकृती तयार केली. भगव्या टोप्या घातलेल्या विद्यार्थ्यांनी दिव्यातील ज्योत साकारली होती. श्रीराम हे अक्षरे पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी 'जय श्रीराम', 'सियावर रामचंद्र की जय' व 'पवनसुत हनुमान की जय' च्या घोषणांनी परिसर दणाणून टाकला.ही अक्षरे साकारण्यासाठी शाळेच्या मुख्याध्यापक मीनाक्षी काळे, पर्यवेक्षक विवेक अलोणी, चित्रकला शिक्षक प्रवीण जिरापुरे, क्रीडाशिक्षक प्रफुल्ल गावंडे, निलेश पत्तेवार, चंद्रकांत मडपाके, विवेक कवठेकर, वैशाली ठाकरे, जया दुधे, पूनम आत्राम, महेश कोकसे, हेरंब पुंड, प्रीती चौधरी, सोनाली पडलवार, संजय येवतकर, दिनेश गहरवार, आशिष दंडावार, दीपाली पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या अक्षरांचे राजेश शर्मा यांनी ड्रोनद्वारे चित्रीकरण केले.विवेकानंद विद्यालायतील या उपक्रमाची शहरात चर्चा रंगली आहे.

## राष्ट्रवादीची आजची सुनावणी संपली विधानसभा अध्यक्षांनी नवे वेळापत्रक जाहीर केले

### राष्ट्रवादीच्या आमदारांच्या अपात्रतेचा निकाल लांबणीवर पडण्याची शक्यता

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक मुंबई**

शिवसेनेचा आमदार अपात्रता आणि पक्ष कोणाचा याचा निकाल लागल्यानंतर राज्याला राष्ट्रवादीच्या सुनावण्यांची उत्सुकता लागली आहे. निकाल देण्यासाठी अवघे १० दिवसच शिल्लक राहिलेले असताना विधानसभवनातून मोठी अपडेट येत आहे. राष्ट्रवादीची दोन्ही गटांची आजची सुनावणी संपली आहे. अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी वेळ वाढविण्याच्या हालचाली सुरु केल्या आहेत.

राष्ट्रवादीच्या आमदारांच्या अपात्रतेचा निकाल लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. अध्यक्ष सुनावणीचे नवीन वेळापत्रक



जाहीर करणार आहेत. यासाठी ते दोन्ही गटाची परवानगी घेणार आहेत, तसा प्रस्ताव ते सर्वोच्च न्यायालयात देणार आहेत. असे झाले तर राष्ट्रवादीतील वादावर निकाल येण्यास फेब्रुवारीचा मध्यावधी उलटू शकतो.

आजच्या सुनावणीवेळी नव्या वेळापत्रकाबाबत चर्चा झाली. दोन्ही गटांना बाजू योग्य पद्धतीने मांडायची असेल तर वेळ देणे गरजेचे आहे. यासाठी वेळापत्रकात बदल करावा लागेल, असे मत अध्यक्षांनी मांडले आहे. सुनावणी, युक्तीवाद, प्रतिवाद यासाठी वेळ कमी देण्यात आला आहे. यावर अध्यक्ष आणि दोन्ही पवार गटांत समझोता झाला आहे.

उद्या रविवार, २२ जानेवारीला राम मंदिराचे लोकार्पण असल्याने पुढील सुनावणी २३ जानेवारीला होणार आहे. २४ जानेवारीला उर्वरित चार जणांची उलट तपासणी, २५ जानेवारीला दोन साक्षीदारांची उलट साक्ष नोंदविली जाणार आहे. २९ आणि ३० जानेवारीला दोन्ही गट आपली अंतिम बाजू मांडतील. ३१ जानेवारीला सुनावणी संपविली जाईल आणि त्यापुढे निकाल देण्यासाठी शिवसेनेप्रमाणेच १० ते १५ दिवसांचा वेळ वाढवून देण्याची मागणी करण्यात येणार आहे.




## लोकशाही गौरव महासभा

वंचित बहुजन आघाडीचे सर्वेसर्वा ॲड. प्रकाश आंबेडकर यांची आज २० जानेवारी ला सायन्सस्कोर मैदानावर विदर्भस्तरीय सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला जिल्हाभरातून मोठ्या संख्येने ॲड. प्रकाश आंबेडकर यांचे विचार ऐकण्यासाठी नागरिक सहभागी झाले होते.



## अयोध्येला जाण्यासाठी अमरावतीहून विशेष रेल्वे

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

अयोध्या येथे २२ जानेवारीपासून प्रभू श्रीरामाचे मंदिर भाविकांसाठी खुले होणार आहे. रामभक्तांना रामलल्लांचे दर्शन घेता यावे, यासाठी नवी अमरावती रेल्वेस्थानकावरून विशेष रेल्वेगाडीच्या दोन फेऱ्या सोडण्यात येणार आहेत.मध्य रेल्वेने नवी अमरावती (अकोली) रेल्वे स्थानकावरून ७ व २५ फेब्रुवारीला दर्शन नगर अयोध्या आस्था रेल्वेची सोय केली आहे. ही रेल्वे ९ व २७ फेब्रुवारीला अयोध्येहून परत निघेल. त्यामुळे कोणत्याही अडचणीशिवाय अमरावतीकर प्रवाशांना थेट शहरातून अयोध्येला जाणे व दर्शन घेतल्यानंतर परत येणे शक्य होणार आहे.




जास्तीत जास्त भाविकांनी रामलल्लांचे दर्शन घेण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. त्यांच्या सूचनेवरून रेल्वेने देशभरातील विविध ठिकाणांहून अयोध्येसाठी आस्था विशेष रेल्वेगाड्या सुरू केल्या आहेत. अमरावतीतूनही अयोध्येसाठी रेल्वे गाडी सोडावी, अशी मागणी खासदार नवनीत राणा यांनी रेल्वेमंत्री, रेल्वे राज्य मंत्र्यांकडे केली. त्यानंतर अमरावतीला आस्था रेल्वेच्या दोन फेऱ्या मिळाल्या आहेत.या गाडीचे बुकिंग फक्त आयआरसीटीसी मार्फतच होणार आहे. तसेच भाविकांना रेल्वेत शाकाहारी जेवण दिले जाणार आहे. नवी अमरावती (अकोली) रेल्वे स्थानकापासून अयोध्येतील दर्शननगर रेल्वे स्टेशन हे अंतर १४५२ किमी. असून २६ तास ५० मिनिटांचा हा प्रवास आहे. नवी अमरावती रेल्वे स्थानकावरून पहाटे ५.१५ वाजता ही गाडी प्रस्थान करेल. मार्गात वर्धा, नागपूर, काटोल, नरखेड, पांढुर्णा व इतर स्टेशनवरून पुढे जात सकाळी ८.०५ वाजता दर्शननगर अयोध्या येथे पोहोचेल. परतीचा प्रवास हा २७ तास १० मिनिटांचा आहे. दर्शननगर अयोध्या येथून ही गाडी सायंकाळी ६.५० वाजता नवी अमरावतीकडे निघेल व दुसऱ्या दिवशी रात्री १० वाजता पोहोचेल. या गाडीला एकूण २२ डबे असून, त्यात २० स्लीपर कोच तर दोन गार्ड्वे कोच राहणार आहेत. ७ फेब्रुवारीला खासदार नवनीत राणा, खासदार डॉ. अनिल बोंडे हे रेल्वेगाडीला हिरवी झेंडी दाखवतील.

## प्रभू रामाचं अस्तित्वच नाकारणारे लोक प्राणप्रतिष्ठा सोहळ्यात

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक ठाणे**

रामराज्य म्हणजे सुशासन, पारदर्शकता आणि वसुधैव कुटुंबकम याचा एकत्रित विचारच. कर्तव्य, श्रमप्रतिष्ठा, कर्मभाव, प्रयत्नवाद म्हणजे रामराज्य. रामराज्य म्हणजे की पंतप्रधान मोदींनी जी संकल्पना मांडली आहे ती दहशतवाद मुक्त भारत, गरिबीमुक्त भारत, घराणेशाही मुक्त भारत, आत्मनिर्भर भारत, एक भारत श्रेष्ठ भारत या रामराज्याच्या संकल्पना आहेत असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



यांनी ठाण्यात म्हटलं आहे. तसंच आपल्या भाषणात त्यांनी विरोधकांवर जोरदार टीकाही केली आहे. ठाण्यात रामायण महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं त्यावेळी केलेल्या भाषणात देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर टीका केली आहे. प्रभू रामाचं अस्तित्व नाकारणारे लोक प्राणप्रतिष्ठा सोहळ्याला कसे काय जातील? असा सवाल त्यांनी केला आहे.

प्रभू श्रीरामांना ऋषींनी का बोलवून घेतलं होतं? तर राक्षस हे त्या काळात सज्जन शक्तींना त्रास देत होते. ऋषी मुनी जे यज्ञ किंवा कर्मकांड करत होते त्यात राक्षस विघ्न आणायचे. त्यावेळी दशरथाकडे ऋषी-मुनींनी केली की प्रभू रामाला पाठवा आणि राक्षसांपासून आम्हाला मुक्ती द्या. याचाच अर्थ दहशतवादापासून मुक्तीची सुरुवात ही प्रभू श्रीरामांनी केली. राक्षसांचा नायनाट केला आणि सज्जनशक्तींना त्रास देणाऱ्यांना वाचवलं. आज या भारतात पंतप्रधान नरेंद्र मोदी दुर्जन शक्ती आहेत, दहशतवाद माजवत आहेत त्यांचा नायनाट करत आहेत. आवश्यकता पडल्यास सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईकही केले जातात आणि ३७० कलम हटवून दुर्जन शक्तींना सांगितलं जातं की भारताचे तुकडे तुम्हाला करु देणार नाही. रामराज्याची संकल्पनेवरच देशाचा कारभार सुरु आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## संपादकीय ......

# तडका : मग अशक्य ते शक्य होईल...!

समाजव्यवस्थेत सध्या गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. पण अजूनही प्रामाणिक माणसांचा सन्मान केला जातो. त्यामुळेच आपल्या देशात गाईंच्या तुलनेत महिषवर्गीय प्राण्यांना क्षुल्लक समजले जाते, गाय दिसली की पाया पडणारे असंख्य भाविक रस्त्याने फिरताना तुम्हाला दिसतील. पण तुम्ही कधी कुणाला म्हशीच्या पाया पडताना पाहिले आहे काय? कधी कुणाला रेड्याच्या पाया पडताना पाहिले आहे काय? ते होणार नाही.गाय पवित्र मानली जाते. गायीचे दूध आरोग्यासाठी उत्तम आहे असे समजले जाते. पण त्याचबरोबर मिठाई तयार करण्यासाठी मात्र म्हशीचे दूध वापरले जाते हे विसरून चालणार नाही. म्हणजे म्हशीनी चारा खाऊन, उत्तम दर्जेचि घट्ट दूध देऊन मानवाची सेवा केली आहे. पण लक्षात कोण घेतो? तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी वेदमंत्र मुखातून वदविण्यासाठी रेड्याची निवड केली होती है आठवून पाहा. ज्ञानेश्वरांवर टीका करणाऱ्या त्या काळच्या समाजधुरिणांनी काय उपयोग आहे वेदमंत्र पठण करण्याचा? कुणाच्याही मुखातून वेद मंत्र पठण करून दाखवता का? असे त्याना चैलेंज केले. नेमका त्याच वेळेला एक रेडा विशेष काही काम नसल्यामुळे रमत गमत बाजूने चालला होता ज्ञानेश्वरांनी त्याला उभे केले, त्याच्या डोक्यावर हात ठेवला आणि काय आश्चर्य। रेड्यामुखी भडाभडा वेद मंत्र बाहेर येण्यास सुरुवात झाली. खरे तर या घटनेपासून रेड्यांना एक प्रकारचे स्टेटस प्राप्त झाले आहे. वेदमंत्र पठण करून घेण्यासाठी संत ज्ञानेश्वरांनी एखाद्या बेलाची किवा गाईची निवड केली नाही तर एका रेडयाची निवड केली हे आधी आपण लक्षात घेतले पाहिजे.कुणाही व्यक्तीचा प्राणी वर्गात समावेश करून उल्लेख केला की, बहुधा मानवाला समाधान मिळत असेल, उन्मत्त झालेला रेडा, भुंकणारा कुत्रा किंवा बेफाम उधळणारा घोडा ही विशेषणे माणसांना लावून त्यांचा अपमान करणे ताबडतोब बंद केले पाहिजे, या ठिकाणी आम्ही माणसांचा अपमान नव्हे तर प्राण्यांचा अपमान करणे बंद केले पाहिजे, असा युक्तिवाद करत आहोत, शिवाय एखादा रेडा उन्मत्त झाला असेल तर त्याच्या नाकात वेसण घालून त्याला जेरबंद कसे करता येईल हे पाहिले पाहिजे. उगाच कुणाला रेडा, घोडा म्हणून प्राणी वर्गाचा अपमान करू नये. समाजातील उन्मत लोकांचा मात्र बंदोबस्त करायला हवा आणि मग समाज जीवन उन्नत होत जाईल यात शंका नाही. समाजात गुन्हेगारी आणि उन्मत्त लोकांचे प्रमाण अधिक वाढले आहे. त्यांना वेळीच वठणीवर आणून अशक्य ते शक्य करण्याची गरज आहे. तरच समाजव्यवस्था सुधारण्यास मदत होईल आणि माणसाचे जीवन सुसहा होण्यास मदत होईल.

# जया वर्णिता शीणली वेदवाणी !

*लहानपणी आई मनाचे श्लोक पाठ करून घ्यायची. शाखेतून आल्यानंतर मनाचे श्लोक, मारुती स्तोत्र आणि रामरक्षा म्हणणे बंधनकारक होते. गेल्या वर्षी मी रामरक्षेतील प्रत्येक ओळीचा अर्थ समजून घेतला. तो पर्यंत हे म्हणायचे असते, एवढेच माहीत होते. त्या मानाने मनाचे श्लोक समजायला सोपे पण पाठ केले*



*त्या वयात नाही. वय वाढू लागल्यावर या पाठांतराचा अर्थ काही अंशी उलगडत गेला.मंदिरात पंगतीत महाप्रसाद घेताना कुठेही श्लोक म्हण, म्हटले की माझा आवडता श्लोक मी म्हणायचो.*अहिल्या शिळा राघवे मुक्त केली**पदी लागता दिव्य होऊनि गेली**जया वर्णिता शीणली वेदवाणी**नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ।।*अहिल्या नामक शापित स्त्री चा प्रभू श्रीरामचंद्रांनी उद्धार केला. अहिल्येला शिळेचे रूप प्राप्त होते, असा भावार्थ अनेक दिवस डोक्यात होता. काही वर्षांपूर्वी आदरणीय किशोरजी व्यास यांचे श्रीराम कथामृत हे पुस्तक वाचण्यात आले. या श्लोकातील ती अहिल्या नसून अहल्या असल्याचे त्या पुस्तकातून कळले. हल म्हणजे नांगर. जी नांगरली गेली नाही अशी जमीन म्हणजे अहल्या. ओसाड झालेला प्रदेश. या ओसाड जमिनी प्रमाणे अहल्येचे जीवन देखील शापित.रामदासांनी या एवढ्या मोठ्या घटनेचे श्लोकाच्या फक्त चार ओळीत वर्णन केले. रामाच्या गुणसमुच्चयाचे वर्णन करताना वेद तोकडे पडतात. वेदांमध्ये आदर्श कल्पनांचा भांडार सामावले असले तरीही त्यापेक्षा श्रेष्ठ रामाची कृती. श्रीरामाच्या जीवनातील फक्त एका प्रसंगावरून समर्थ रामदास एका ओळीत श्रीरामाच्या जीवनाचे महत्व आपल्याला पटवून देतात.अहल्येची अवस्था अशी का झाली, या कथेत मला फारसा रस कधीच वाटला नाही. कारण एकूणच प्रकरण संतापजनक आहे. माझ्या वर्तमानात या देशातील कुठल्याही नारीवर होणारा अन्याय, अत्याचार जसा चीड आणणारा तसाच प्रसंग अहल्येच्याही जीवनात आलेला. एकूणच हा प्रसंग आठवला की मला खावर या गजलकाराचा एक शेर आठवतो.माणसांच्या सभ्यतेचा काळ सांगा कोणता ?कोणत्या काळात सांगा, सभ्य होती माणसे ?हा शेर तंतोतंत खरा वाटू लागतो. अघोरी वासनेचा बळी ठरलेली अहल्या नवरा आणि समाजाच्या कोणाच्याच सहानुभूतीचा विषय बनलेली नाही. समाजाने कुलटा ठरवून अहल्येलाच दोषी ठरवलेले. वंचितांचे जीवन तिच्याच वाट्याला. राजसत्ता देखील हस्तक्षेप करायला तयार नाही. एखाद्या स्त्रीला लांच्छन लावून तिला बहिष्कृत केलं जातं आणि समाजात कोणीच यावर भाष्य करण्यास तयार नाही. एखाद – दुसऱ्या व्यक्तीला सहानुभुती वाटली असेलही कदाचित. पण त्यांची प्रचलित व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवण्याची हिंमत नाही. ऋषीकुळातील अहल्या तर प्रातिनिधिक स्वरूपाची. देवलोकातील इंद्रामुळे तिच्या वाट्याला निर्जीव पाषाणागत जीवन आलेले. देवत्वाचा दर्जा असलेल्यांनी विकारांवर ताबा मिळवला नाही. भोगविलासाच्या लालसेत मर्यादांचे उल्लंघन त्याने केले पण वंचना आली अहल्येच्या वाट्याला. सामान्यपणे जगणाऱ्या इतर स्त्रियांची अवस्था काय असेल ? भरतभू वर दानवांचे, दैत्यांचे प्राबल्य वाढलेले असल्याने त्यांनीही उद्धवस्त केलेल्या स्त्रियांचे काय ? व्यवस्था एवढी भ्रष्ट झालेली की कोणाकडून अपेक्षा करायची ? समाजाने वाळीत टाकलेल्या आणि त्यामुळे पुन्हा पुन्हा अत्याचाराला सामोरे जाणाऱ्या या घटकाचा वाली कोण ? कदाचित अहल्याही चुकली असेल पण शिक्षा भोगण्याचे, परित्यक्तेचे आणि सामाजिक बहिष्काराचे जीवन तिच्याच वाट्याला आलेले. उदाहरणादाखल एकच प्रकरण विस्ताराने वाल्मिकींनी मांडले असले तरी समाजाच्या एकूणच अवस्थेसाठी ते प्रातिनिधिक स्वरूपाचे आहे.मिथिलेच्या प्रवासा दरम्यान हा ओसाड, खडकाळ प्रदेश दिसताच रामाकडून नेमका प्रश्न येतो आणि विश्वामित्र रामाला एकेकाळी सुजलाम सुफलाम असलेल्या या प्रदेशाची कथा सांगतात. गौतम ऋषींसह समाजाने बहिष्कृत केलेल्या अहल्येलाच निर्वासितांचे जीवन कंठावे लागत आहे. आजही ती जगते आहे. केवळ एकाच आशेवर. आपला गेलेला सन्मान परत मिळावा. आपल्या चारित्र्यावर, त्याहीपेक्षा मनावर कोरलेले व्रण कधीतरी पुसले जावे, याचसाठी तिचा जगण्याचा अट्टहास आहे. श्रीरामाच्या सर्व धमण्यांमधून रुधिराचा थेंब थेंब अधिक वेगाने धावू लागला. संतप्त श्रीराम मर्यादा पुरुषोत्तम असल्याने व्यक्त होत नव्हते. पण लक्ष्मण मर्यादांना बांधील नव्हता. तो त्याच्या स्वभावगुणाप्रमाणे व्यक्त झाला. अर्थातच ते व्यक्त होणे इतरांना घायाळ करणारे होते. सत्तेच्या मदात सुखासीन झालेल्या अधमांच्या मुळे अहल्येच्या नशिबी हे दुर्दैव आले होते. ऋषीकुळातील सज्जनशक्ती देखील पीडितेचे दुःख समजून न घेता अहल्येला वाळीत टाकून निघून गेले. श्रेष्ठत्वाचा अधिकार प्राप्त केलेले गौतम ऋषी न्यायशास्त्राचे प्रतिपादक होते. पण कुटुंबातील घटनेत त्यांचे न्यायशास्त्र कुठे थिटे पडले, हे समजायला मार्ग नाही.विश्वामित्रांच्या तोंडून प्रसंगावर्णन पूर्ण व्हायच्या आतच रामाची पावलं झपझप अहल्येच्या दिशेने निघाली. अशा असंख्य पीडितांना न्याय कोण देणार ? समाजाच्या मुख्य प्रवाहात सन्मानाने जगण्याचा अधिकार त्यांना कोण प्राप्त करून देणार ? की मरणाच्या शेवटच्या घटकेपर्यंत तिने फक्त दुःखच कुरवाळत बसायचे का ? पण दुर्दैव ! समाजात असा प्रश्नच कोणाच्या मनात निर्माण झाला नाही. रामाच्या मनात प्रश्न उपस्थित होण्याचे कारणच नव्हते. कारण रामाजवळ उत्तर होते. होय ! मी अयोध्यापती राजा दशरथपुत्र राम न्यायाचा हात समोर करतो आहे. करुणेने ओथंबलेला हा हात आहे. रामाने अहल्येचा सन्मान केला की सर्व सन्मान करतील. तिच्या वाट्याची वंचना संपेल. समाजाची दृष्टी बदलेल. तिच्या मनावर झालेल्या खोलवरच्या जखमांवर मायेची फुंकर घातली जाईल. रामाला अहल्येमध्ये परित्यक्ता किंवा पतीता नव्हे तर अन्यायाविरुद्ध लढा देणारी स्वाभिमानी स्त्री दिसते आहे. तिचा लढा आत्मसन्मानाचा होता. आणि रामाने तिच्या या तपश्चर्येसमोर आपले मस्तक टेकवले. जेव्हा राम अहल्येला समाजात स्थान देतो तेव्हा पुन्हा तेच गौतम ऋषी पुन्हा तिला पत्नीचा दर्जा देतात. पुन्हा शतानंदाला आपली आई मिळते. समाज व्यस्था परिवर्तनासाठी मानसिकता परिवर्तन महत्वाचे असते. तो केवळ अहल्येचा उद्धार नव्हता तर तत्कालीन सर्व पिडीत महिलांच्या जीवनात निर्माण झालेला आशेचा किरण होता. म्हणूनच समर्थ रामदास एका ओळीत मोठे सार मांडतात. जया वर्णिता शीणली वेदवाणी !श्रीरामजन्मभूमी वर राम प्रतिष्ठापित होत आहेत. रामा सोबतच रामाचे आदर्शही आपल्या जीवनात आणण्याचा संकल्प आपल्या राष्ट्रमंदिराला अधिक समृद्ध करू शकेल !

**शिवराय कुळकर्णी**
प्रवक्ता, भाजपा,
महाराष्ट्र
९८८१७१७८२७



# जनावरांसाठी उन्हाळी वैरण पिकांची लागवड- डॉ. प्रियंका तोंडे, डॉ. अतुल ढोक

भारतात सध्यास्थीतीत एकुण अंदाजे १९२ दशलक्ष गायी, १०९ दशलक्ष म्हशी, १४८ दशलक्ष शेळया, ७४ दशलक्ष मेंढया आहेत. इतके पशुधन भारतात असले तरी त्यांची उत्पादन क्षमता कमी आहे. व अश्या परिस्थीतीत पशुखाद्य आणि चारा यांची प्रत व उपलब्धता कमी असल्यामुळे उत्पादन वाढविणे एक मोठे आव्हान आहे. देशात चारा पिकांकरीता लागवडीखालील क्षेत्र केवळ चार टक्के ऐवढे आहे. तसेच दरडोई जमीनीची उपलब्धता दिवसेंदिवस कमी होत असुन भविष्यात चारा पिकांखालील क्षेत्र वाढण्याची शक्यता कमी आहे. याचाच परिणाम असा की आज देशात हिरवा चारा, खाद्य आणि वाळलेल्या चाऱ्याची कमतरता आहे. वैरण पीकाखाली केवळ ४ टक्के जमिन असली तरी वैरण पिकांवर जास्तीत जास्त लक्ष केंद्रित करुन ४ टक्के चारा घेतल्या जाणाऱ्या जमीनीवरच वैरण उत्पादनात वाढ करता येईल म्हणूनच या संदर्भात भारत सरकारने सन १९८५ मध्ये नॅशनल वेस्टलैंड डेव्हलपमेंट बोर्डची स्थापना केली. निकृष्ठ जमिनीचा विकास, जंगलातील वनस्पती वाढविणे आणि झाडे लावणे हा मुख्य उद्देश असुन हा प्रकल्प राष्ट्रिय स्तरावर १९९९ पासुन राबविण्यात आलेला आहे. तसेच झाँसी येथे भारतीय गवताळ जमीन आणि वैरण संशोधन संस्थेची स्थापना करण्यात आली. भारतीय कृषि अनुसंधान परीषदेने भारतीय वैरण पिके समन्वयक संशोधन प्रकल्प कार्यान्वित केला व याचे फलीत म्हणजे १०० च्या वर वैरणीच्या जाती विकसीत करण्यात आल्यात. तसेच राज्य शासनाद्वारे सुध्दा या दिशेने बरेच प्रयत्न केले जातात.

**वैरणीच्या पिकांचे विविध प्रकारचे वर्गीकरण व त्याअंतर्गत येणारी पिके**

**वैरण**– पिकांचे वर्गीकरण– एकदल (वार्षिक किंवा बहुवार्षीक)

**द्विदल (वार्षिक किंवा बहुवार्षीक)**–कुरणावरील गवते वैरणीकरता उपयुक्त झाडे झुडपे

**वार्षिक एकदल**– यात मका, ज्वारी, बाजरा, रागी, ओट, माकचरी इत्यादींचा समावेष होतो. लागवडी खालील बहुवार्षीक गवतेनेपिअर बाजरा (संकरीत गवत), पॅरा, गिनी, नेपीअर, ब्लुपॅनीक थिननेपीअर, सुदान, इत्यादी

**वार्षिक गवते – दिनानाथ**

**द्विदल / शेंगाधारी :**वार्षीक – बरसीम, लुसर्न/लसुन, चवळी, चनामठ, गवार, मुंग उडीद, तुर इत्यादी बहुवार्षिक – लुसर्न / तुर

**कुरणावरील गवते**– देशी हराळ, मारवेलशेंगाधारी – स्टायलो, सिरेट्रो, कुयरी झाडेझुडपे सुबाभुळ, शेवरी/हेटा/अगस्थी, शेवरा, गिरीपुष्प, सौदंळ/शगी

यामध्ये अश्या वैरण पिकांची लागवड करावी ज्यांची कमी काळात झटपट वाढ होते, जास्तीत जास्त पाने आणि वैरण उत्पादन क्षमता जास्त असते, चवदारपणा व उत्तम पोषणमुल्ये असतात तसेच बदलत्या वातावरणात व निरनिराळया जमीनीवर जुळवून घेणारे असावे, या पिकांमध्ये रोगांचा प्रादुर्भाव कमी असावा तसेच त्यापासुन उत्तम प्रतिचे बियाणेसुध्दा मिळावे, वैरण पिकांसाठी जमिनीची मशागत

**१. जमीन किमान २ ते ३ वेळा चांगली नांगरून घ्यावी,**

२. वैरणीची पिके ही पहिल्या पिकांच्या वेळेस दिलेल्या सेंद्रीय खताच्या उर्वरीत जोरावर तग धरतात परंतु चांगल्या वैरण उत्पादनाकरीता सेंद्रीय खताचा नियीमत वापर करावा.

३. वैरण पिकांच्या पेरणीच्या वेळेस बीयाणे जास्त वापरावे. त्यामुळे पिक सरळ वाढते उत्पादनात



वाढ होते आणि जनावरे चारा बाया कमी घालवतात.

४. बहुदा वैरण पिकाचे बियाणे फेकुन पेरतात तिफन किंवा ट्रॅक्टरच्या सहाय्याने पेरणी करावयाची असल्यास दोन ओळीतील अंतर कमी ठेवावे,

**उन्हाळ्यात घेता येईल अशी वैरण पिके व त्यांची लागवड –** १. ज्वारी – यामध्ये पुसाचारी, एमपीचारी सुधारीत रामकेल, नांदीयाल, आयजीएफआर आय १ व २ या विविध जाती आहेत. ज्वारीची पेरणीसाठी ४० ते ५० किलो बियाणे प्रति हेक्टरी वापरावे तसेच दोन ओळीतील अंतर २५–३० सेमी ठेवावे रासायनिक खतांमध्ये नत्र : स्फुरद पालाश ८०:३०:२० या प्रमाणात दोनवेळा विमागुन प्रतिहेक्टरी द्यावे. पिक साधारणतः ६० ते ९० दिवसात कापून, हिरव्या चान्याचे उत्पादन ३० ते ३५ टन प्रति हेक्टरी प्राप्त होते.

२. मका अफ्रिकन टॉल, मांजरी, गंगा–२, गंगा ५ या काही मक्याच्या जाती आहेत. मक्याची पेरणी फेब्रुवारी मार्च दरम्यान करुन ७५ किलो बियाणे प्रति हेक्टरी वापरुन दोन ओळीतील अंतर २५–३० सेमी ठेवावे, रासायनिक खतांची मात्र नत्र, स्फुरद, पालाश, १०:३०:२० या प्रमाणात दोन वेळा विभागून द्यावी. प्रती हेक्टरी ३५ ते ४० टन उत्पादन साधारणतः ६५ ते ७० दिवसानंतर कापणी करुन घेता येईल.

**३. चवळी** – यामध्ये राशियन जायंट, इसी २४१६, सी. ओ १ या जाती आहेत, प्रति हेक्टरी ४५ ते ५० किलो बियाणे वापरुन फेब्रुवारी दरम्यान पेरणी करता येईल. दोन ओळीतील अंतर २५ ते ३० सेमी असावे. खताची मात्र नत्र स्फुरद पालाश १५:९०:३० या प्रमाणात द्यावी, चवळीची कापणी ६० ते ६५ दिवसानंतर करुन हिरव्या चा–याचे उत्पादन ३० ते ३५ टन प्रति हेक्टरी घ्यावे.४. सुदान गवत (सिरसा) या गवताची पेरणी ३२ ते ३४ किलो बियाणे प्रति हेक्टरी वापरुन मार्च महिन्यात करावी. दोन ओळीतील अंतर २५ ते ३० सेंमी ठेवावे तसेच १६८ किलो अमोनियम सल्फेट प्रति हेक्टरी खत द्यावे. या गवताची पहिली कापणी ६० ते ७० दिवस व नंतरच्या कापण्या ४५ दिवसांनी कराव्यात या गवताचे उत्पादन ३३ ते ४४ टन प्रती हेक्टर ऐवढे होते. तसेच सुबाभुळचे पिक उष्ण व अवर्षणग्रस्त परिस्थीतीत वाढण्याची क्षमता असल्यामुळे कोरडवाहु शेतात पोष्टीक चान्यासाठी लागवड करणे उपयुक्त ठरते. सुबाभुळसाठी खोल, हलकी, भारी जमिन तसेच मुरमाड जमिनीतसुध्दा पिकांची उत्तम वाढ होते. या साठी बियाणे ८ ते १० किलो प्रति हेक्टरी असुन दोन रोपातील अंतर ५० से १०० सेनि असावे. सुबाभुळची रोप लावणीपद्धतीने पेरणी केली जाते. व पिकाला २५ टन शेणखत, १० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ३० किलो पालाश द्यावे. लावणी नंतर साधरणतः ६ महिन्यांनी दिड ते दोन मिटर उंचीची झाडे झाल्यावर पहिली कापणी जमिनीपासुन ७० ते ८० सेमि उंचीवर करावी, नंतरच्या कापण्या ४० ते ५० दिवसाच्या अंतराने कराव्यात यामुळे दरवर्षी ७ ते ८ कापण्यांपासुन सुमारे ७५ ते १०० टन हिरवा चारा प्राप्त होतो बीयाण्यांचा पुरवठा नियमित ठेवण्याकरीता राज्यातील शेतकन्यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध होण्याच्या हेतुने महाराष्ट्र शासनाने बिज प्रमाणीकरण यंत्रणेची स्थापना केली. तसेच बिजोत्पादन कार्यक्रम राबविणा–या संस्था कार्यरत आहेत. यामध्ये महाबीज, राष्ट्रीय बिज निगम, वैरणीची बी–बीयाणे त्याची प्रत व पुरवठा शेती महामंडळे, कृषी विद्यापीठे इत्यादीचा समावेश आहे.

**वैरण पिकांवर येणारे किड रोग व त्याचे व्यवस्थापन**– वैरण पिकांची पेरणी दाट करतात आणि ओळीतील अंतर सुध्दा कमी असते. त्यामुळे नगदी पिकांच्या तुलनेत वैरण पिके रोगास फार कनी बळी पडतात. खोडमाशी व खोडकिडा हे वैरणपिकात प्रामुख्याने आढळणारे रोग आहेत. यावर उपाय म्हणजे खोडकिडयांसाठी पोंगा जळून गेलेली खोड उपटुन काढुन जाळावी व उपयुक्त कीटकनाशकांची फवारणी करावी.

**लक्षात ठेवण्याच्या महत्वाच्या बाबी**

१. वैरण पिकांत सहसा आंतरमशागत करत नाहीत.

२. वैरण पिके जर धान्य पिके असतील तर पिक दुधाच्या अवस्थेत असतांना कापणी करावी. आणि शेंगावर्गीय पिके शेंगा पोपटावर आल्यावर म्हणजेच कोवळ्या असतांना कापणी करावी. जास्त कापण्या देणारी पिके लागवडीखाली असली तर कापण्या वेळेवर केल्या जातील हयाची काळजी घ्यावी. त्यामुळे चांगल्या प्रतिचे वैरण मिळते.

३. वैरण पिक हे मुख्य पिकाच्या अगोदर किंवा दोन महत्वाच्या पिकात घेण्याची प्रथा आहे. अशी वैरण पिके बहुधा मिश्र पिक असते त्यामुळे वैरणाचा चवदारपणा आणि पोषणमुल्ये सुधारण्यास मदत होते.

**डॉ. प्रियंका तांडे** ,प्रक्षेत्र व्यवस्थापक , पुण्यश्लोक अहिल्यादेवी मेंढी व शेळी विकास प्रक्षेत्र पडेगांव, (छत्रपती संभाजीनगर)




## वाढत्या वयामुळे विसराळूपणा वाढत चाललाय? रोज खा ५ पैकी एक गोष्ट-स्मरणशक्ती वाढेल, राहाल फिट



***दि.२० विदर्भ प्रजासत्ताक*** *असेल तर, आपल्या आयुष्यात सर्वच गोष्टी बर्यापैकी होतात. आहाराचा आपल्या शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर थेट परिणाम होतो. त्यामुळे निरोगी आयुष्य जगण्यासाठी उत्तम आहार घेणं गरजेचं आहे. बरेच जण मेंदू तल्लख व्हावे यासाठी निरनिराळे पदार्थ खातात.*

*मुख्य म्हणजे फक्त बदाम खाल्ल्यानेच बुद्धी वाढते, असं काहींचं म्हणणं आहे. पण फक्त बदाम नाही, तर इतरही पदार्थांचा मनावर आणि स्मरणशक्तीवर परिणाम होतो वय वाढलं की, विसराळूपणा वाढत जातो. पण जर मेंदू तीक्ष्ण राहावे, शिवाय स्मरणशक्ती वाढावी असे वाटत असेल तर, आजपासूनच ५ पदार्थ खायला सुरुवात करा.*

***अक्रोड*** *– एनसीबीआयच्या अभ्यासानुसार, मेंदू तीक्ष्ण चालावे असे वाटत असेल तर, नियमित अक्रोड खा. अक्रोड खाल्ल्याने मेंदूतील रक्ताभिसरण वाढते. ज्यामुळे ऑक्सिजन आणि इतर पौष्टीक घटक मेंदूपर्यंत सहज पोहचतात. याशिवाय अक्रोडमध्ये असलेले एल–कार्निटाइन मेंदूचे कार्य सुधारते. जर आपण नियमित अक्रोड खात असाल तर, स्मरणशक्ती तर वाढेलच, शिवाय तणाव देखील कमी होऊ शकते.*

***डार्क चॉकलेट***– *लहानग्यांपासून थोरामोठ्यांपर्यंत प्रत्येकाला चॉकलेट्स आवडतात. पण डार्क चॉकलेट खाल्ल्याने स्मरणशक्ती वाढू शकते.डार्क चॉकलेटमध्ये फ्लेव्होनॉइड्स आढळते. ज्यामध्ये न्यूरोप्रोटेक्टिव्ह पॉवर असते. यामुळे वय जरी वाढलं तरी, स्मरणशक्ती कमी होत नसून, वाढत जाते. शिवाय विसराळूपणा देखील कमी होते.*

**पालक** – *पालक विशेषतः मेंदूसाठी चांगले मानले जाते. पालकामध्ये ब जीवनसत्त्वे, व्हिटॅमिन ई, व्हिटॅमिन के, फोलेट आणि एल–टायरोसिन असतात. हे पौष्टीक घटक स्मरणशक्ती वाढवण्यासाठी मदत करतात. यासह मानसिक स्थिती सुधारण्यासही मदत करते. हिवाळ्यात पालक मोठ्या प्रमाणात मिळतात. आपण पालकाचे ज्यूस, पराठा किंवा भाजी तयार करून खाऊ शकता.*

***व्हिटॅमिन ई***– *मेंदूला व्हिटॅमिन ई ची आवश्यकता असते. हे एक अँटीऑक्सिडंट आहे जे फ्री रॅडिकल्स नष्ट करण्यात मदत करते. जर फ्री रॅडिकल्स वाढेल तर, ऑक्सिडेटिव्ह तणाव वाढू लागते. या प्रकारचा ताण डिमेंशियासह अनेक आजारांना कारणीभूत ठरते.*

***नासलेल्या दुधाचा खवा***– *जेव्हा दूध नासते तेव्हा त्यातील पाणी आटवून, खवा तयार केला जातो. हा खवा मेंदू आणि आरोग्यासाठी फायदेशीर ठरते.*

*खवा पोटातील हेल्दी माइक्रोब्स सुधारते. ज्याचा थेट सकारात्मक परिणाम मानसिक आरोग्यावरही होतो. यामुळे संज्ञानात्मक कार्यक्षमता वाढते आणि वृद्धापकाळातही स्मरणशक्ती अबाधित राहते.*

# बारावीच्या विद्यार्थ्यांना मिळणार ऑनलाईन हॉलतिकिट

## शाळा, महाविद्यालयात सोमवार पासून वाटप

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी / मार्च २०२४ मध्ये घेतल्या जाणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षांचे हॉल तिकीट ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून दिले जाणार आहे. उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांनी सोमवार दि. २२ रोजी राज्य मंडळाच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड केलेले हॉल तिकीट विद्यार्थ्यांना द्यावेत. तसेच हॉल तिकीटसाठी विद्यार्थ्यांकडून कोणतेही वेगळे शुल्क आकारू नये, असे राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी स्पष्ट केले आहे.

राज्य शिक्षण मंडळातर्फे नऊ विभागीय मंडळामार्फत फेब्रुवारी / मार्च महिन्यात इयत्ता बारावीच्या परीक्षा घेतल्या जाणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर ऑनलाईन हॉल तिकिट उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. सर्व विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील सर्व उच्च माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी इयत्ता बारावीच्या परीक्षेची ऑनलाईन प्रवेशपत्रे प्रिंट करून विद्यार्थ्यांना द्यायची आहेत. हॉल तिकिट ओपन करताना काही त्रुटी आढळून आल्यास हॉल तिकिट गुगल क्रोम मध्ये ओपन करावे. हॉल तिकिट विद्यार्थ्यांना प्रिंट करून देताना त्यांच्याकडून कोणतेही शुल्क आकारू नये. तसेच हॉल तिकीटावर मुख्याध्यापक किंवा प्राचार्य यांचा शिक्का मारून स्वाक्षरी करावी.

हॉल तिकिटावरील फोटो सदोष असल्यास त्यावर विद्यार्थ्यांचा फोटो चिटकवून त्यावर संबंधित मुख्याध्यापक/ प्राचार्यांनी शिक्का मारून स्वाक्षरी करायची आहे. एखाद्या विद्यार्थ्याकडून हॉल तिकीट गहाळ झाल्यास संबंधित उच्च माध्यमिक संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांनी पुन्हा हॉल तिकीट काढून त्यावर लाल शाईने द्वितीय प्रत असा शेरा मारून विद्यार्थ्याकडे हॉल तिकीट द्यावे, असेही राज्य मंडळाच्या परिपत्रकात नमूद केले आहे.



### विभागीय मंडळातून करून घ्याव्यात दुरुस्त्या

हॉल तिकिटांमध्ये विषय किंवा माध्यम बदल असेल तर त्याच्या दुरुस्त्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळात जाऊन करून घ्याव्यात. हॉल तिकिटावरील फोटो स्वाक्षरी विद्यार्थ्याचे नाव यासंदर्भातील दुरुस्ती शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर करून त्याची एक प्रत विभागीय मंडळाकडे त्वरित पाठवावी.

# अकोल्यात तुरीला उच्चांकी, १० हजार २८५ रुपये दर; ४ हजार कट्ट्यांची आवक

## आणखी दर वाढण्याचा अंदाज

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अकोला :** येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमधे शुक्रवारी तुरीला या वर्षाचा उच्चांकी १० हजार २८५ रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला असून, तूर उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. बाजार समितीत ४ हजार कट्टयांची आवक झाली असून, आगामी दिवसात तुरीचे आणखी दर वाढण्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी वर्तविला आहे.

जिल्ह्यात तूर सोंगणी व काढणीला सुरुवात झाली आहे. यंदाच्या खरीप हंगामात पेरण्या उशिराने झाल्याने हंगाम लांबला. त्यात अपुऱ्या पावसामुळे खरीप पिकांच्या उत्पादनात प्रचंड घट झाली. तुरीचे पीक ऐन फुलधारणेच्या अवस्थेत असताना अवकाळी पावसाचा फटका बसला. त्यानंतर ढगाळ वातावरण व अळींच्या प्रकोपामुळे तुरीचे प्रचंड नुकसान झाले. सध्या तुरीची सोंगणी व काढणी सुरू आहे. जिल्ह्यात उत्पादनात प्रचंड घट झाल्याचे पहावयास मिळत आहे. एकरी एक ते दोन



क्विंटलच उत्पादन होत असल्याचे चित्र आहे. बाजारातही नवीन तूर दाखल झाली असून, मुहूर्ताचा ९ हजारांवर दर मिळाला होता. आता नववर्षात तुरीच्या दरात वाढ झाली असून, शुक्रवारी तुरीला उच्चांकी १० हजार २८५ रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला आहे.

### ४ हजार कट्ट्यांची आवक

बाजारात नवी तूर दाखल होत आहे. जिल्ह्यात तुरीच्या काढणीला वेग आल्याने बाजारातही तुरीची आवक वाढल्याचे चित्र आहे. शुक्रवारी तब्बल ४ हजार कट्टे तूरीची आवक झाल्याची माहिती आहे. आगामी दिवसात आणखी आवक वाढण्याची चिन्हे आहेत.

यंदा खरीप हंगामातील तुरीच्या पिकाला चांगलाच फटका बसला आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत तुरीला मागणी आहे. उत्पादनात प्रचंड घट झाल्याचे चित्र असल्याने आगामी दिवसात तुरीचे दर वाढण्याची शक्यता आहे – बिहारी जयराज, व्यापारी, अकोला.

# २९ जानेवारीपासून विद्यापीठांतर्गत विविध स्पर्धांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांच्या हिवाळी-२०२३ पर्यायी परीक्षा

## विद्यार्थ्यांनी नोंद घेण्याचे विद्यापीठाचे आवाहन

**दि२०विदर्भ प्रजासत्ताकअमरावती –** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातंर्गत क्रीडा, सांस्कृतिक, आविष्कार, आव्हान, उत्कर्ष अशा विविध स्पर्धांमध्ये सहभागी व विद्यापीठाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी प्रमाणित केलेल्या विद्यार्थ्यांच्या विद्यापीठीय पर्यायी परीक्षा येत्या २९ जानेवारी, २०२४ पासून घेण्यात येणार आहे. परीक्षा विभागाने कळविल्यानुसार, अमरावती जिल्हातील विद्यार्थ्यांची परीक्षा ही श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती (११८) या परीक्षा केंद्रावर, अकोला जिल्हातील विद्यार्थ्यांची परीक्षा श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला (२०५), बुलडाणा जिल्हातील विद्यार्थ्यांची परीक्षा जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा (३०२), यवतमाळ जिल्हातील विद्यार्थ्यांची परीक्षा अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ (४०१), वाशिम जिल्हातील विद्यार्थ्यांची परीक्षा आर.ए. महाविद्यालय, वाशिम (७०१) तसेच अभियांत्रिकी अभ्यासक्रमाकरीता विद्यार्थ्यांच्या हिवाळी-२०२३ परीक्षेच्या प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे.विद्यार्थ्यांना असेही सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांचे हिवाळी-२०२३ परीक्षेकरीता देण्यात आलेले परीक्षा क्रमांक व प्रवेशपत्र हे पर्यायी परीक्षेकरीता कायम राहतील. तसेच वेळापत्रक व परीक्षा केंद्रनिहाय रोललिस्ट विद्यापीठाच्या्.िसलर्री.रल.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे, याची सर्व विद्यार्थी, पालक, केंद्राधिकारी, परीक्षा केंद्र, महाविद्यालयांचे प्राचार्य यांनी नोंद घ्यावी व अडचण असल्यास परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या संचालक सौ. मोनाली तोटे पाटील यांचेशी ९७६३८३३९६९ या संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठाच्यावतीने करण्यात येत आहे.



# श्री क्षेत्र ऋणमोचन येथे सुरू झाले श्रमदान

## ४ फेब्रुवारीला होणारअन्नदान, वस्त्रदान कार्यक्रम

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक दर्यापूर–** तालुक्यातील अमला ग्रामपंचायत अंतर्गत कार्यरत असलेले श्री संत गाडगे महाराज यांची प्रथम कर्मभूमी श्रीक्षेत्र ऋणमोचन येथे दरवर्षी संत गाडगेबाबांनी सुरू केलेला उपक्रम म्हणजे अंध अपंग कुष्ठरोगी निराश्रीत पुरुष स्त्रिया यांना वस्त्रदान अन्नदान मुर्तीजापुर, दर्यापूर तालुक्यातील व्यापारी मंडळींतर्फे तसेच अमरावती अकोला मुंबई येथील व्यापारी यांच्यातर्फे हा कार्यक्रम आयोजित केला आहे या कार्यक्रमाच्या निमित्ताने श्री गाडगे महाराज लक्ष्मीनारायण ट्रस्ट संस्थान श्रीक्षेत्र हनुमान येथे गेल्या आठ दिवसापासून स्वच्छता मोहीम सुरू आहे पूर्णा नदीच्या पुरामुळे स्वच्छ झालेले घाट व परिसर हा स्वच्छ करण्याचे काम संस्थेचे प्रमुख बापूसाहेब देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असून त्यावेळेस बांधलेले नदी काठी पाच घाट उभारलेले आहे त्यामधील दोन घाट भातकुली तालुक्यातील ऋणमोचन या गावाच्या बाजूने तर तीन घाट श्री क्षेत्र मोचन अमला या बाजूने उभारलेले आहे चार फेब्रुवारीला दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा कार्यक्रमाचे आयोजन असल्याने एक महिना त्याच ठिकाणी सातत्याने राहणारे वसंतराव देशमुख मुर्तीजापुर हे स्वत:सह गाडगेबाबांचे सेवक मंडळी ना घेऊन स्वच्छता करण्याचे काम करीत आहेत घाट हा पूर्णा नदीच्या पुरामुळे मातीमध्ये दिसण्याचा झाला आहे व त्यामुळेच या तीनही घाटांची साफसफाई करण्याचे काम सध्या युद्ध पातळीवर सुरू आहे.



# मानधन वाढीचा अध्यादेश तत्काळ काढा अन्यथा जेलभरो

## आंदोलनाच्या आठव्या दिवशी आशा व गटप्रवर्तकांचा निर्वाणीचा इशारा

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताकअमरावती–** आशा व गटप्रवर्तकांच्या मानधन वाढीचा अध्यादेश तात्काळ काढा अन्यथा जेलभरो आंदोलन करू, असा इशारा आशा व गटप्रवर्तकांनी शुक्रवारी आंदोलनाच्या आठव्या दिवशी दिला. सरकार मानधन वाढ देण्याचे मान्य करुनही लबाडी करत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.



आयटक संलग्न आशा व गटप्रवर्तक संघटनेच्या वतीने गेल्या आठ दिवसांपासून जिल्हा परिषद मुख्यालयाबाहेर बेमुदत धरणे आंदोलन सुरु आहे. अजूनही मानधनवाढीचा अध्यादेश निघाला नसल्याने शासनाने तात्काळ शासन निर्णय न काढल्यास जेलभरो आंदोलन करणार असल्याचेआंदोलक कर्मचाऱ्यांनी जाहीर केले. आशा व गटप्रवर्तकांना संप काळात मान्य केलेल्या मागण्याबाबत जिआर न काढल्यामुळे चिडलेल्या महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा व गटप्रवर्तक संघटना आयटक, महाराष्ट्र राज्य आशा-गटप्रवर्तक कर्मचारी कृती समितीतर्फे

राज्यव्यापी बेमुदत संप सुरु आहे. आंदोलनात संघटनेचे जिल्हा सचिव प्रफुल्ल देशमुख, रेखा मोहड, रेणुका बाळे, करुणा मंडवधरे, मंगला काळे, अमिता मेश्राम, सुनिता झोड, संगिता भस्मे, मिना भगत, शिलानिकम, चेतना नेरकर, सुनिता चोरकर, शिल्पा नागदिवे, छाया इंगळे, उषा वानखळे, निषा सुपले, बबिता बमनोटे, सुलोचना संनतापे, उषा गाडगे, कविता पवार, भारती बालपांडे, सिमा भाकरे, प्रविणा पडोळे, जयश्री ठवकर, साधना तायडे, कांता इंगोले, माया वाडेकर, रुपाली पिसके, मिरा साबळे, शुभांगी कडू, आशा गायगोले, प्रगती महानकर, सरिता पिसके, पूजा भाडणे, सरिता कातळे, प्रभा वानखडे, शर्मिला पाटील, विजया रंगे, सुषमा लोहकर, मंगला बोबळे, चेताली लिंगोट, सुनिता तिरपुडे, अर्चना घोरपडे, कुसुम बारसकर यांच्यासह मोठ्या संख्येने आशा व गटप्रवर्तक सहभागी आहेत.

# चौदा कोटींचा प्रीमियम अन् चार कोटींचाच परतावा

## आंबिया बहरचा फळपीक विमा; संत्रा, मोसंबी, केळी उत्पादक चिंतेत

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** आंबिया बहरासाठी गतवर्षीच्या हंगामात उत्पादक व शासनाचा असा एकूण १४.१८ कोटींचा प्रीमियम फळपीक विमा कंपनीकडे जमा झालेला आहे. प्रत्यक्षात फळबागांचे नुकसान झालेले असताना कंपनीद्वारा आतापर्यंत १४१४ शेतकऱ्यांना ४.२५ कोटींचा परतावा देण्यात आलेला आहे. कंपनी फळपीक विमा देण्यास टाळाटाळ करीत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे.

सन २०२२-२३ मधील आंबिया बहरसाठी हवामानावर आधारित फळपीक विमा योजनेत ३५१७ शेतकऱ्यांनी फळपिकाचा विमा काढला होता. यासाठी चार कोटींचा शेतकरी हिस्सा व साधारण १० कोटींचा राज्य व केंद्र शासनाचा हिस्सा असा एकूण १४.१८ कोटींचा प्रीमियम पीक विमा कंपनीकडे यापूर्वीच जमा करण्यात आलेला आहे. त्यामुळे फळपिकांच्या नुकसानीसाठी कंपनीद्वारा परतावा मिळण्याची प्रतीक्षा शेतकरी करीत आहे. दुसरीकडे तांत्रिक कारणांचा आधार घेत कंपनी परताव्यासाठी टाळाटाळ करीत असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे.



# लाभार्थ्यांपर्यंत योजना पोहचविण्यासाठी शासकीय यंत्रणानी समन्वयाने नियोजन करा- सौरभ कटियार

## केंद्र शासनाच्या विविध योजनाचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती, १** केंद्र शासनाव्दारे समाजातील सर्व घटकासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजनाची अंमलबजावणी गतिमान होण्यासाठी विशेष मोहिमही राबविण्यात येत आहे. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत केंद्र शासनाच्या योजनांचा लाभ पोहचविण्यासाठी शासकीय यंत्रणेने समन्वयाने नियोजन करा, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी संबंधितांना दिले.

जिल्हाधिकारी यांच्या दालनात केंद्र शासनाच्या विविध योजनेचा आढावा जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला, त्यावेळी ते बोलत होते. निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. विवेक घोडके, जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक पंकज कुमार, जिल्हा आरोग्य अधिकारी सुरेश आसोले, अतिरिक्त जिलहा आरोगय अधिकारी डॉ. सुभाष ढोले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कैलास घोडके, जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे, जिल्हा सूचना अधिकारी अरुण रणवीर, तसेच विविध विभाग प्रमुख यावेळी उपस्थित होते.

श्री. कटियार म्हणाले की, पारंपारीक कारागिर आणि हस्तकलेच्या वस्तूंची निर्मिती करणाऱ्या उद्योगासाठी केंद्र शासनाने प्रधानमंत्री विश्वकर्मा कौशल्य सन्मान योजना राबवित आहे. या योजनेचा जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना लाभ मिळवून द्यावा. यासाठी संबंधित यंत्रणा व जिल्हा अग्रणी बँकेनी पुढाकार घेऊन लाभार्थ्यांचे प्रस्ताव तातडीने मार्गी लावावे. तसेच प्रधानमंत्री स्वनिधी योजनेंतर्गत प्राप्त कर्ज प्रस्तावाचे पुर्तता करुन लाभार्थ्यांना लाभ मिळवून द्यावा. आयुष्यमान भारत योजनेला जिल्ह्यात समाधानकारक प्रतिसाद असून तो वाढविण्यासाठी संबंधित विभागाने विशेष मोहिम राबवावी, असे निर्देश यावेळी दिले.केंद्र शासनाच्या विविध योजनेचा आढावा घेताना ते पुढे म्हणाले की, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत लाभ पोहोचविण्यासाठी केंद्र शासनाव्दारे विकसित भारत संकल्प यात्रा मोहिम सुरु आहे. या यात्रेच्या माध्यमातून दुर्गम व ग्रामीण भागात शासनाच्या विविध योजनाची माहिती देऊन पात्र लाभार्थ्यांना यात्रा दरम्यान लाभ द्यावा. ज्या लाभार्थ्यांना लाभ दिला आहे, त्यांची माहिती केंद्र शासनाच्या वेब पोर्टलवर नियमित अपलोड करावी. यावेळी केंद्र शासनाच्या दीनदयाल अंत्योदय योजना, पीएम आवास योजना, पीएम गरीब कल्याण योजना, पीएम उज्वला योजना, पीएम विश्वकर्मा, पीएम किसान सन्मान, किसान क्रेडिट कार्ड, पीएम पोषण अभियान, हर घर जल-जल जीवन मिशन, स्वामित्व, जन धन योजना, जीवन ज्योती बिमा योजना, सुरक्षा बिमा योजना, अटल पेन्शन अशा विविध योजनाचा आढावा घेऊन योजनाचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांना देण्यासाठी सर्व विभागाने समन्वयाने मिशन मोडवर काम करावे, असे निर्देश यावेळी दिले.



# नागपूर होणार 'राम'पूर, सहा हजार स्थानांवर कार्यक्रम; जागोजागी लागणार 'स्क्रीन्स'

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक नागपूर** : २२ जानेवारी रोजी अयोध्येतील श्रीराममंदिरात रामलल्लाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना होत असताना नागपुरातदेखील प्रतिअयोध्याच साकारणार आहे. शहरातील मुख्य चौकांपासून ते गल्ल्यांपर्यंत रामनामाचाच जप निनादेल असे नियोजन करण्यात आले आहे. नागपुरात त्या दिवशी सहा हजार स्थानांवर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दोन तासांतच शहरातील हजारहून अधिक मंदिरांत पूजाअर्चना होणार असून शहरातील प्रत्येक नागरिकाने त्यात सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

शुक्रवारी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद व भारतीय जनता पक्षातर्फे संयुक्त पत्रपरिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात या तयारीबाबत माहिती देण्यात आली. यावेळी विहिंपचे महाराष्ट्र–गोवा क्षेत्राचे मंत्री गोविंद शेंडे, श्रीरामजन्मभूमी प्राणप्रतिष्ठा उत्सव समितीचे महानगर संयोजक अमोल ठाकरे, सह संयोजक गौरव जाजू, भाजपचे प्रदेश प्रवक्ते चंदन गोस्वामी, भावना भगत प्रामुख्याने उपस्थित होते. नागपुरातील सहा हजार स्थानांवर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

संघाच्या ३६२ वस्तींमध्ये वस्तीप्रमुख नेमण्यात आला आहे. शहरातील प्रत्येक वस्तीतील तीन ते चार मंदिरांत कार्यक्रम होतील, अशी माहिती देण्यात आली.



### शहरातील पाच लाख घरांपर्यंत प्रत्यक्ष पोहोचल्या अक्षत

अयोध्येतून आलेल्या पवित्र अक्षतांचे घरोघरी वितरण करण्याचे नियोजन करण्यात आले होते. नागपुरातील ५.३२ लाख घरांपर्यंत प्रत्यक्ष अक्षता पोहोचल्या आहेत. रविवारपर्यंत अक्षत वितरण करण्यात येणार आहे. या निमंत्रण मोहिमेत १६ हजार ९७६ कार्यकर्ते सहभागी झाले होते. त्यात ६ हजार ५२९ महिला व १ हजार ८६० विद्यार्थ्यांचा समावेश होता.

### सर्वच प्रमुख मंदिरांमध्ये महाआरती

२२ जानेवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी १ या कालावधीत शहरातील सर्वच प्रमुख मंदिरांमध्ये महाआरतीचे आयोजन करण्यात आले आहे. वर्धा मार्गावरील साईमंदिरात किन्नर समाजातर्फे आरती करण्यात येणार आहे. तर बहुतांश ठिकाणी कारसेवेत सहभागी झालेल्या नागरिकांना आरतीचा मान देण्यात येणार आहे.

# डोळ्यांचे पारणे अखेर फिटले, रामलला मूर्तीचे दर्शन झाले

## काळ्या पाषाणापासून बनविलेल्या या मूर्तीचे मनमोहक रूप पाहून रामभक्तांचे मन झाले तृप्त

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अयोध्या –** अयोध्या : भए प्रगट कृपाला दीनदयाला कौसल्या हितकारी। हरषित महतारी मुनि मन हारी अद्भुत रूप बिचारी।। श्रीरामचरितमानसमधील प्रभू श्रीरामाचे वर्णन करणाऱ्या या छंदाची प्रचिती तमाम रामभक्तांना शुक्रवारी आली जेव्हा अयोध्येच्या राममंदिरातील रामलल्लाच्या मूर्तीचे अनावरण २२ जानेवारी रोजी होणाऱ्या 'प्राणप्रतिष्ठा' सोहळ्याच्या तीन दिवस आधी करण्यात आले.

काळ्या पाषाणापासून बनविलेल्या या मूर्तीचे मनमोहक रूप पाहून रामभक्तांचे मन तृप्त झाले. म्हैसूरचे शिल्पकार अरुण योगीराज यांनी रामलल्लाची ही ५१ इंची मूर्ती साकारली आहे. अभिषेक सोहळ्याचे प्रमुख आचार्य अरुण दीक्षित यांनी सांगितले की, दुपारी वैदिक मंत्रोच्चारात भगवान रामांची मूर्ती गर्भगृहात ठेवण्यात आली. ट्रस्टचे सदस्य अनिल मिश्रा यांच्या हस्ते 'मुख्य संकल्प' करण्यात आला. रामलल्लाच्या तात्पुरत्या मंदिरातील दर्शन सायंकाळ पासून थांबवण्यात आले आहे. शुक्रवारी सकाळी अरणि मंथनातून अग्नी प्रदीप्त करण्यात आला. त्याआधी गणपती इत्यादी स्थापित देवतांची पूजा, आदी विधी झाले.





**अयोध्येतील मंदिरात प्रतिष्ठापित होणाऱ्या मूर्तीचे अनावरण**

# अमरावती विभागातील ७६ एसटी बसचालक प्रतिनियुक्तीवर, आरटीओत जाणार दिमतीला

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती –** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी) मध्ये अतिरिक्त असलेल्या चालकांची पडताळणी केली जात आहे. या चालकांना प्रादेशिक परिवहन कार्यालय विभागा मध्ये कायम स्वरूपी प्रतिनियुक्ती दिली जाणार आहे. मात्र, यासाठी चालकांना इच्छुक असल्याचा अर्ज करावा लागणार आहे. त्या अनुषंगाने वरिष्ठस्तरा वरून आलेल्या निर्देशाप्रमाणे अमरावती विभागातील ७६ एसटी बस चालकांनी या प्रतिनियुक्तीवर जाण्यासाठी स्थानिक एसटी प्रशासनाकडे अर्ज दाखल केले आहेत. एसटी महामंडळाच्या मुख्यालयाने राज्यातील आगारात अतिरिक्त चालक कुठे आहेत का? याची माहिती मागविली आहे. याअनुषंगाने अमरावती विभागातील आठ आगारांची माहिती गोळा केली आहे. यात कोणत्या आगारात किती चालक असून, त्यात किती अतिरिक्त आहेत, याची माहिती घेण्यात आली आहे. विशेष म्हणजे ज्या जिल्ह्यात चालक अतिरिक्त आहेत, त्यांना स्वजिल्ह्याच्या आरटीओ कार्यालयात कायम स्वरूपी प्रतिनियुक्ती मिळणार आहे. हा चालकांचा ऐच्छिक प्रश्न असून त्याकरिता अर्ज मागविले होते. त्यानुसार अमरावती येथील एसटीच्या विभाग नियंत्रक कार्यालयाकडे अतिरिक्त असलेल्या ७६ चालकांनी आरटीओ विभागात प्रतिनियुक्ती वर जाण्याची तयारी दर्शविली आहे.

> आगारनिहाय अतिरिक्त चालकांची माहिती मुख्यालयाकडून मागविली आहे. याकसाठी इच्छुक असलेल्या चालकांनी अर्ज करायचा आहे. त्यांचे वेतन आरटीओकडून मिळेल. ही प्रतिनियुक्ती कायमस्वरूपी राहणार आहे. अमरावती विभागात यासाठी ७६ जणांचे अर्ज आले आहेत.– **नीलेश बेलसरे, विभाग नियंत्रक**

# अमरावती मध्यवर्ती कारागृहात 'किओस्क मशीन' कार्यान्वित

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताकअमरावती,** शिक्षाधीन व न्यायाधीन बंद्यांचे शिक्षा, उच्च न्यायालयात दाखल असलेल्या क्रिमीनल रिट पिटीशन तसेच बंद्यांची इतर माहिती जाणून घेण्यासाठी अमरावती मध्यवर्ती कारागृह येथे किऑस्क मशीन लावण्यात आली आहे. या मशिनचे उद्धाटन कारागृह व सुधारसेवा नागपुरचे महानिरीक्षक डॉ. जालिंदर सुपेकर यांचे हस्ते आज करण्यात आले. यावेळी कारागृह उपमहानिरीक्षक यु.टी. पवार, अमरावती मध्यवर्ती कारागृह अधीक्षक किर्ती चिंतामणी, तसेच कारागृहाचे इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या बॉयोमेट्रीक्स टच स्किन किओस्क मशनीमध्ये कैद्यांची केसची स्थिती, कैद्यांची खाजगी रोख रक्कम, पुढील सुनावणीची तारीख, पॅरोल, रिलीझ तारीख, मुलाकातच्या उर्वरित संधी, फोन इत्यादी सुविधा कारागृहातील बंद्यांना माहिती स्वत:पाहता येणार आहे.



# नाशिक, कर्नाटकचे 'ते' दोघे अमरावतीत जेरबंद

## चायना चाकू, खंजीरसह कार जप्त, गुन्हे शाखेच्या युनिट दोनची कारवाई

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती :–** घातक शस्त्रे बाळगून कारने फिरणाऱ्या तिघांना गुन्हे शाखेच्या युनिट दोनने १८ जानेवारी रोजी रात्री वडाळी नाका परिसरातून अटक केली. त्यांच्याकडून चायना चाकू, खंजीरसह कार असा एकूण २ लाख ६९ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. जावेद शेख वल्द अनीस शेख (३८, रा. नाशिक), मोहम्मद अरफाद वल्द शेख हुसेन (३०, रा. बंगलोर, कर्नाटक) व अब्दुल अहफाज वल्द अब्दुल अजीज (२४, रा. लालखडी, अमरावती) अशी अटक आरोपींची नावे आहेत.गुन्हे शाखेच्या युनिट दोनचे पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वातील पथक गुरुवारी रात्री गस्तीवर होते. त्यावेळी वडाळी नाका येथे संशयास्पदरित्या आढळून आलेल्या एका कारला अडवून झडती घेण्यात आली. झडतीत कारमध्ये ७ चायना चाकू, खंजीर अशी घातक शस्त्रे आढळून आली. त्यानुसार पथकाने कारमधील जावेद शेख, मोहम्मद अरफाद व अब्दुल ऐफाज यांना अटक केली.

त्यांच्याकडून घातक शस्त्र व कार असा २ लाख ६९ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई गुन्हे शाखेच्या युनिट दोनचे पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वात साहाय्यक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, पोलीस उपनिरीक्षक राजकिरण येवले, संजय वानखडे, राजेंद्र काळे, जावेद अहेमद, दीपक सुंदरकर, गजानन ढेवले, एजाज शहा, संग्राम भोजने, नईम बेग, चेतन कराडे, राजीक रायलीवाले, योगेश पवार, नीलेश वंजारी, संदीप खंडारे यांनी केली.





# ट्रायबलच्या इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळांची तपासणी आणि गुणांकन बंद

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती : –** आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्थ इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळांची तपासणी आणि गुणांकन प्रक्रिया आता बंद करण्यात आली आहे. यापुढे मंजुर विद्यार्थी संख्येनुसार शाळांना शुल्क मिळणार असल्याने या निर्णयामुळे राज्यातील खासगी शैक्षणिक संस्था चालकांवर राज्य सरकार मेहरबान असल्याचे बोलले जात आहे.

मुंबई येथे मंत्रालयात आदिवासी विकास मंत्री डॉ. विजय गावित यांच्या अध्यक्षतेखाली २ जानेवारी २०२४ रोजी नामांकित शाळांच्या प्रश्नाविषयी महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली. या बैठकीत कोविड काळातील सन २०२०–२०२१ आणि २०२१–२०२२ या वर्षाचे नामांकित शाळांच्या थकीत शिक्षण शुल्कावर चर्चा करण्यात आली. हे थकीत शुल्क आता नाशिक येथील आयुक्त कार्यालयातून अदा करण्याचा निर्णय झाला आहे. राज्यात जुन्या नामांकित शाळांची तपासणी, गुणांकन यापुढे होणार नाही, असे ठरविण्यात आले. तसेच या शाळांना पूर्वीच्याच गुणांकनानुसार शुल्क अदा करण्यात येणार आहे. नवीन प्रस्ताव प्राप्त शाळांचे गुणांकन प्रथम वर्षीच करण्यात येईल. नामांकित शाळांची तपासणी ही वर्षातून दोन वेळा करण्यात येणार असली तरी ज्या प्रकल्प कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात ही शाळा आहे त्याच प्रकल्प अधिकाऱ्यांकडून तपासणी केली जाणार आहे. २०२४–२०२५ या वर्षापासून ग्रेडेशन बंद होऊन पहिली ते बारावीपर्यंत आदिवासी विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क निश्चित करण्यात आले आहे. नामांकित शाळांचे सन २०२३–२४ या वर्षाचे ५० टक्के शैक्षणिक शुल्क दिले जाणार आहे. या बैठकीला नामांकित शाळांचे प्रतिनिधी मनोज हिरे, डॉ. सुधीर जगताप, रवींद्र पाटील, अनिल रहाणे, सुभाष चौधरी हे हजर होते.



### अपर आयुक्तांचे अधिकार गोठविले

आदिवासी विकास विभागाच्या नागपूर, ठाणे, अमरावती व नागपूर येथील अपर आयुक्तांकडे इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळांची तपासणी, गुणांकनाबाबत असलेले अधिकारी या नव्या निर्णयाने गोठविले आहे. आता नामांकित शाळांच्या संचालकांच्या प्रकल्प अधिकारी ते नाशिक येथील आयुक्त कार्यालय असा फाईलींचा प्रवास असणार आहे. अपर आयुक्त कार्यालयातील हस्तक्षेप रोखण्यात आला आहे.

# स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान; पंधरवाडा जनजागृतीकरीता सर्व विभागांने प्रयत्न करावे- जिल्हाधिकारी सौरभ कटियार

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती,** केंद्रीय कुष्ठरोग विभागाच्या निर्देशानुसार राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथीचे औचित्य साधून दि. ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२४ या पंधरवाड्यात 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या पंधरवाडा कालावधीत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून कुष्ठरोग जनजागृतीकरीता आरोग्य विभागासोबत समन्वय साधून सर्व विभागांनी संयुक्तीक प्रयत्न करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.

जिल्हाधिकारी यांच्या दालनात जिल्हास्तरीय समन्वय समिती सभा आज पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश असोले, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी सुभाष ढोले, आरोग्य सेवा कुष्ठरोग सहाय्यक संचालक रमेश बनसोड, स्वयंसेवी संस्थेचे सुरेश धोंडगे, पर्यवेक्षक डि. एस. गडलींग, गजानन पन्हाळे, अविनाश इंगळे, रितेश ठाकरे, वैद्यकीय अधिकारी पूनम मोहकार, विनिती नवरे आदी उपस्थित होते.



सौरभ कटियार म्हणाले की, राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमाचे ध्येय व उदिष्ट साध्य करण्यासाठी ग्रामीण व शहरी भागात जनजागृती करावी. अभियान कालावधीमध्ये विविध उपक्रम राबवावे. यामध्ये ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसभेचे आयोजन करुन व्याख्यान, कुष्ठरोग निर्मुलन प्रतिज्ञा, कुष्ठरोगाबाबत प्रश्नोत्तरे, कुष्ठबाधित व्यक्तींचा सत्कार इत्यादी उपक्रम राबवावे. तसेच प्रत्येक शासकीय कार्यालयांमध्ये कुष्ठरोग निर्मुलन प्रतिज्ञाचे वाचन करावे. जिल्ह्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यामिक शाळांमध्ये अभियान कालावधीमध्ये निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, पथनाटय, रॅली तसेच जिल्हास्तरीय मॅरेथॉन, आरोग्य मेळावे असे जनजागृतीपर कार्यक्रम घ्यावे. कुष्ठरोग जनजागृतीसाठी आरोग्य विभागासोबत समन्वय साधून सर्व विभागांनी संयुक्तीक प्रयत्न करावे, असे निर्देश यावेळी दिले.

कुष्ठरुग्ण शोध मोहीम दि.२० नोव्हेंबर ते ६डिसेंबर २०२३ या कालावधीमध्ये अमरावती जिल्ह्यातील ग्रामिण, शहर व महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात आली. या अभियानामध्ये जिल्हयातील ३२८ नविन रुग्णांचे निदान करुन औषधोपचार देण्यात आले. या अभियानामध्ये महाराष्ट्र राज्यातून अमरावती जिल्ह्याचा रुग्ण शोध कार्यामध्ये व्दितीय स्थान प्राप्त झाल्याबद्दल जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्हास्तरीय अधिकारी तसेच कर्मचारी यांचा सत्कार केला.

**पाहिजेत**

**विदर्भ प्रजासत्ताक**
सांध्य मराठी दैनिक

अल्पावधीतच हजारो वाचकांच्या पसंतीस पडलेल्या सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक साठी जिल्ह्यातील प्रत्येक तालुका,गाव तसेच वॉर्डनिहाय पत्रकारांची गरज आहे.लिखाणाची आवड तसेच उत्कृष्ट जनसंपर्क असणाऱ्या व्यक्तींनीच आमच्या मेल आय डी वर आजच संपर्क करा

संपर्क– prajasattaknews24gmail.com

# दक्षता ! हाच सायबर क्राईमवर सक्षम उपाय : मोहिनी मोडक

## महिला महाविद्यालयात दोन दिवसीय खापर्डे व्याख्यानमालेचा शुभारंभ : पहिले पुष्प–सायबर सुरक्षा आणि आपण

**दि.२० विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

आश्चर्यच ! म्हणावे लागेल की, अवघ्या काही दशकांमध्ये मानवी बुद्धीमत्ता कल्पनेच्या पलिकडे असलेले तंत्रज्ञान साकारात आहे. साधारणपणे १९५० नंतर आजवर जे शोध जागतिक स्तरावर लावल्या गेले, ते संशोधन आणि तंत्रज्ञान आज दरदिवशी वेगाने अद्ययावत होत आहे. विमान, स्मार्ट मोबाईल फोन, कम्प्युटर, इंटरनेट आणि आता एआय सारखे तंत्रज्ञान मानवी समाजाला एका उंच अशा स्तरावर नेत आहेत. प्रामुख्याने यामध्ये मोबाईल–इंटरनेट प्रत्येकाच्या जीवनाशी वेगाने जुळत आहे. त्यामुळे आज इंटरनेट व स्मार्ट फोन शिवाय जगणे शक्यच नाही ही धारणा जनमनामध्ये घट्ट झाली आहे. आज मोबाईल केवळ संवादाचं माध्यम राहीलं नाही तर ते जीवनाचं आणि जगण्याचं एक प्रतिरूप झालं आहे. शिक्षण, व्यवहार, संवाद आणि त्याही पलिकडे मानवी अस्तीत्वाचं प्रदर्शन इंटरनेटवर अवलंबुन राहीलं आहे. त्यामुळे सहाजिकच इंटरनेट मानवी जीवनासाठी वरदान असल्याचे भासत आहे. मात्र, हेच वरदार जेव्हा शाप ठरते तेव्हा अस्तीत्व उध्वस्त होते अशा अनेक घटना मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. दरदिवशी वृत्तपत्रांतून सायबर क्राईम च्या विविध प्रकारच्या घटना मनाला चटका लावणार्या ठरत आहे. त्यामुळे इंटरनेट हातळण्याचे तंत्र जनसामान्यांना आत्मसात करावं लागणार आहे. त्यासाठी दक्षता हेच सायबर क्राईमवर रामबाण उपाय असल्याचे मत हेरायझन वेब टेक्नॉलॉजीज च्या संचालिका व सायबर सुरक्षा तज्ञ मोहिनी महेश मोडक यांनी व्यक्त केले.




अमरावती शहर व जिल्ह्याचं वैभव स्वातंत्र्य सेनानी दादसाहेब खापर्डे यांनी स्थापित केलेली शैक्षणिक संस्था नूतन विदर्भ शिक्षण मंडळ अंतर्गत १९६५ मध्ये कै. बाबासाहेब खापर्डे, यांनी महिलांना उच्च शिक्षण प्रदान करण्यासाठी महिला महाविद्यालयाची स्थापना केली. त्यांच्या कार्याला उजाळा देण्याच्या उद्देशाने विद्यार्थीनी व अमरावतीकरांकरीता कै. बाबासाहेब खापर्डे यांच्या स्मृती प्रित्यर्थ खापर्डे व्याख्यानमालेची वैचारिक चळवळ मागील ६५ वर्षांपासून अविरत असून दि.१९ जानेवारी २०२३ रोजी महिला महाविद्यालय येथे दोन दिवसीय खापर्डे व्याख्यानमालेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा डॉ. मायाताई शिराळकर, प्रमुख अतिथी म्हणून दै. हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास अ. मराठे, महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील उपस्थित होते. व्याख्यानमालेची सुरूवात सरस्वती पूजन, कै. दादासाहेब व बाबासाहेब खापर्डे यांच्या प्रतिमा पुजनाने झाली. यावेळी सुमधुर गीतांद्वारे मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

सायबर सुरक्षा आणि आपण या विषयावर खापर्डे व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफतांना सायबर तज्ञ माहिनी मोडक यांनी अभ्यासपुर्ण मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या, तंत्रज्ञानाचा विकास हा मानवी समाजासाठी एक उन्नतीचे वरदान ठरले आहे. आज आपल्या जवळ असलेला स्मार्ट फोन आपल्याला अधिक सोपं जीवन जगण्याची सुविधा देतो. पूर्वी मनी ऑर्डर आणि बँकांद्वारे होणारे व्यवहार आता फोनच्या माध्यमातून होत आहेत तेही सुरक्षीतरित्या. ही किमया इंटरनेटची असून इंटरनेटद्वारे अख्ख जग एका क्लिकवर आलं आहे. यामध्ये व्हाट्सअॅप, फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर, यु–ट्युब सारखे अॅप माणसाला दिवस आणि रात्रभर गुंतून ठेवत आहे. अशा पद्धतीने सर्व काही चांगली आणि सुरळीत वाटत असतांना दरदिवशी मोबाईल व इंटरनेट द्वारे सायबर क्राईमच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. आता तर आर्टीफीशल इंटीलीजन्स सारखे तंत्रज्ञान मानवी दृष्टीकोण आणि विचारसरणीवर थेट आघात करीत आहे. इंटरनेटचा गैरवापर करणारे सायबर गुन्हेगार प्रत्येक क्षणी फास टाकुन राहत आहेत. या सर्व सायबर गुन्हे विषयक घटना विविध स्तरावर वेगवेगळ्या असल्यातरी अशा गुन्ह्यांमध्ये फसणारे तरूण–तरूणी, महिला–पुरूष यांचे आयुष्यच उध्वस्त होत असल्याचे भयावह वास्तव समोर येत आहे. अशावेळी एक दक्ष व्यक्ती म्हणून सायबर क्राईम बाबत सजग व दक्ष रहाणे प्रत्येकासाठी काळाची गरज आहे.

इंटरनेट वापरतांना काही महत्वाच्या गोष्टींवर लक्ष देणे गरजेचे आहे. प्रामुख्याने आपला पासवर्ड, ओटीपी गोपनीयता आणि सोशल मिडीयावर सुरक्षा यंत्रणांची सेटींगवर यावर प्रत्येकाचे बारकाईने लक्ष असणे गरजेचे आहे. कारण इंटरनेटच्या युगामध्ये डेटा आज पैशांपेक्षा अधिक मौल्यवान आहे. त्यामुळे मोबाईल व इंटरनेट वापरतांना आपल्यावर कोणीतरी प्रत्येक क्षण लक्ष देत असतो ही बाब आता उघड झाली आहे. अशावेळी सायबर क्राईम होण्याची शक्यता अधिक वाढते. यामध्ये हॅकींग, लुबाडणुक, मानसिक शोषण आणि लैंगीक अत्याचार व शोषणा संदर्भात गुन्हे वाढत आहे. या प्रकरणाची दखल घेण्याकरीता सायबर सेल पोलीस यंत्रणा कार्य करीत आहे पण गुन्हा घडूच नये याकरीता जनसामान्यांना अधिकाधिक दक्ष होण्याची गरज आहे. त्याकरीता ज्ञान आणि प्रशिक्षण महत्वाचे असून ते आत्मसात केल्यास सायबर क्राईमवर बर्याच प्रमाणात आळा बसू शकतो आणि आपलं सर्वांचं जीवन सुरक्षीत राहू शकते असा विश्वास सायबर तज्ञ मोहिनी मोडक यांनी व्यक्त केला.

यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. मायाताई शिराळकर व प्रमुख अतिथी दै. हिंदुस्थानचे प्रबंध संपादक विलास अ. मराठे यांनी मनोगत व्यक्त करीत व्याख्यानमालेच्या माध्यमातून वैचारिक चळवळ अविरत असल्याचे समाधान व्यक्त केले. खापर्डे व्याख्यानमालेच्या पहिल्या पुष्पाचे प्रास्ताविक महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी केले. संचलन व आभार प्रा. ममता पांडे यांनी मानले. कार्यक्रमाला संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक वर्ग व मोठ्या संख्येने विद्यार्थीनी, नागरीक उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

### अंतीम पुष्प – भरकटणाऱ्या संस्कृतीची दिशा

नूतन विदर्भ शिक्षण मंडळाद्वारे संचालीत महिला महाविद्यालय येथे आयोजीत दोन दिवसीय कै. बाबासाहेब खापर्डे व्याख्यानमालेचे दुसरे व अंतीम पुष्प 'भरकटणार्या संस्कृतीची दिशा' वक्ते सतीश मोहन फडके गुंफणार आहे. वैचारिक चळवळीला बळ देणार्या या व्याख्यानमालेचा विद्यार्थी व नागरीकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश मोहरील यांनी केले आहे.

# महिला महाविद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन

## विद्यार्थिनींनी नृत्य सादर करीत केली कला गुणांची उधळण

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

नुतून विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय येथे वार्षिक स्नेहसमेलनाचे आयोजन करण्यात आले या स्नेहसंमेलनाचे उदघाटन हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी ताई चेंडके यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान नूतन विदर्भ संस्थेच्या अध्यक्ष डॉ मायाताई शिराळकर यांनी भूषविले या प्रसंगी संस्थेचे माननीय पदाधिकारी तसेच महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश मोहरील



उपस्थित होते .

अमरावती शहरातील नामांकित असलेल्या महाविद्यालयापेकी नुतून विदर्भ शिक्षण मंडळ द्वारा संचालित महिला महाविद्यालय येथे वार्षिक स्नेहसमेलनाचे आयोजन करण्यात आले तीन दिवसीय या स्नेहसंमेलनाचे शुक्रवारी उदघाटन झाल्यांनतर महाविद्यालयाच्या बी.ए., बी.कॉम,आणि बीव्हॉक च्या विद्यार्थिनींनी नृत्य सादर करीत उपस्थितांची मने जिंकलीत या मध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रीयन संस्कृती,शिवकालीन पोवाडा,सोबतच बेटी बचाओ – बेटी पढाओ ही एकांकिका सादर करण्यात आली. यावेळी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी ताई चेंडके, डॉ.माया शिराळकर अध्यक्ष नूतन विदर्भ शिक्षण मंडळ, सुभाष कसबेकर जेष्ठ उपाध्यक्ष नू.वि.शि. मंडळ, पं.किशोर नवसाळकर उपाध्यक्ष नू.वि. शि. मंडळ,व्ही.डी. जोशी उपाध्यक्ष नू.वि.शि. मंडळ, निनाद सोमण ,सचिव नू.वि.शि. मंडळ व समस्त कार्यकारिणी उपस्थित होते. शनिवारी गायन स्पर्धा व त्यांनतर बक्षीस वितरणाचा समारंभ पार पडला.

# महावितरणने विद्यार्थ्यांना दिले वीज सुरक्षेचे धडे

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

महावितरणच्या वीजेमुळे जीवन कसे सुसह्य झाले आहे.तसेच याच विजेमुळे अनावधानाने झालेली चुकही कशी आणि किती घातक ठरू शकते,त्याचबरोबर वीज वापरतांना काय काळजी घ्यावी याबाबत महावितरणकडून विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.



महावितरण वरूड उपविभाग १ च्या माध्यमातून न्यू आॅरेंज सिटी कॉन्व्हेंट वरुड च्या विद्यार्थ्यांशी महावितरणतर्फे शाळेतील सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यात आला आणि त्यांना विजेबाबत माहिती देण्यात आली. वीज ही लहान मोठा असा भेदभाव करीत नाही.त्यामुळे विद्यार्थ्यांनी देखील पंतग उडवितांना तसेच खेळतांना वीज वाहिन्यांपासून सुरक्षीत अंतर ठेवले पाहिजे. त्याचबरोबर वीजेशी प्रत्येकांचा संबंध असल्यामुळे ओल्या हाताने वीजेची कळ दाबू नये,किंवा वीज खांबाशी बांधलेल्या तारेवर कपडे वाळत घालू नये आदी बारीक–बारीक बांबीकडे झालेले दुर्लक्ष जीवावर कसे बेतू शकते याबाबत माहिती देण्यात आली.तसेच मानवी जीवनामध्ये विजेचे महत्व खूप असले तरी वीज निर्मितीसाठी आवश्यक असणारा कोळसा मर्यादीत आहे.त्यामुळे वीजेची बचत केली पाहिजे,गरज नसतांना वीजेचा वापर टाळला पाहिजे. झोपतांना वीज दिवे बंद केले पाहिजे अश्या दैनंदिन बाबीबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

महावितरणे उपकार्यकारी अभियंता राजेश दाभाडे,यांच्या पुढाकाराने घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात न्यू आॅरेंज सिटी कॉन्व्हेंटचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र राजुरिया, प्राचार्य माधुरी भोंडे ,महावितरणचे सहाय्यक अभियंता स्वप्निल हेट यांच्यासह कॉन्वहेंटचे शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# जिजाऊ बँकेच्या कर्मचाऱ्यांनी नूतन अध्यक्ष, उपाध्यक्षांचे केले अभिष्टचिंतन

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

स्थानिक जिजाऊ कमर्शियल को–ऑपरेटिव्ह बँक मुख्य शाखा, प्रशासकीय कार्यालय व सर्व विविध शाखेतील अधिकारी तथा कर्मचाऱ्यांनी नव्याने निवडून आलेले अध्यक्ष इंजि.अविनाश कोठाळे व उपाध्यक्ष इंजि.प्रदीप चौधरी यांचे संयुक्तरित्या अभिष्टचिंतन करीत त्यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

जिजाऊ कमर्शियल को–ऑपरेटिव्ह बँकेत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्यावतीने नुतन पदाधिकाऱ्यांना बँकेतर्फे संयुक्तरित्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन वानखडे, उपमुख्य कार्यकारी



अधिकारी हरिष नाशिरकर, अर्चना बारबुद्धे, मंजुषा वैद्य, पवन कडू, सागर राऊत, योगेश चांदुरकर, श्रीकांत दाळू, नमिता ठाकरे, भारती लांबसे, वैकुंठनाथ साळुंखे, राजेंद्र कडू, हर्षल भाले, राजेंद्र राऊत, आकाश वानखडे, शैलेश यादव, निर्णय फुलाडी, राहुल आमले, संजय भामोदकर, शहाजी चौधरी, प्रणव कांबे, प्रशांत बारबुद्धे, अभिजीत पवित्रकार, गौरव वाकोडे, विवेक हाटे, गणेश कडू, पंडित मोरशे, विजय ढोबे, मनीष देशमुख, दीपक मेटे, अभिजीत राऊत, किरण दिवाण, चैताली गुडधे, चैताली वानखडे, नंदकुमार भड, सचिन ठाकरे, खंडेश्वर ढोरे, वैष्णवी हाटे यांच्यासह अन्य मान्यवरांनी नवनियुक्त अध्यक्ष इंजि.अविनाश कोठाळे व उपाध्यक्ष प्रदीप चौधरी यांना पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# शासन मान्य ब वर्ग तिर्थक्षेत्र महर्षी वाल्मिकी मठाचे मठाधिपती ऋषी ज्ञानेश्वर माऊली पोहचले अयोध्येत




**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

दर्यापुर तालुक्यातील समदा काशीपुररामायण रचीयता आद्यकवी महर्षी वाल्मिकी यांचें नावाने जगभर प्रसिद्ध असलेले प्राचीन व शासन मान्य ब वर्ग तीर्थक्षेत्रा चे या मठाचे मठाधिपती ऋषी ज्ञानेश्वर महाराज माऊली हेहे आज महर्षी वाल्मिकी आंतरराष्ट्रीय विमानतळ आयोध्या येथे त्यांचे प्रथम पाऊल पडले, त्यांना श्री राम जन्मभूमि तीर्थक्षेत्र आयोध्या चंपतराय महासचिव यांचे पत्र क्रमांक ०७९९ अन्वये निमंत्रण दिले होते. योगा योग व आनंद असा की महर्षि वाल्मिकी जयंती महोत्सव समितीचे आयोजक उमेश ढोणे,एकनाथ वावरे, प्रकाश दंदे , कर्नल लक्ष्मणराव गाले,अमोल वारघडे ,एकनाथ मानकर, संजय कोलटके, डॉक्टर बाळकृष्ण दंदे, मोहन जामणेकर, कैलास खोबरखेडे, आदींसह असंख्य वाल्मीकि भक्तांनी प्रधानमंत्री व नृत्य गोपाल दास महंत व चंपतराय यांच्याकडे सातत्याने मागणी करत देशाचे प्रधानमंत्री यांनी महर्षी वाल्मिकी आंतरराष्ट्रीय विमानतळ अयोध्या हे नाव देऊन ही मागणी पूर्ण करत त्यांचे उद्घाटनही काही दिवसांपूर्वी त्यांनी केले या गोष्टीचा योगायोग असा की महर्षी वाल्मिकी मठाचे मठाधिपती व वाल्मिकी यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय विमानतळ असलेल्या आयोध्या येथीलविमान तळावर ऋषी ज्ञानेश्वर महाराज यांनी प्रथम पाऊल ठेवत महर्षि वाल्मिकी व श्रीरामाचा नामजप करून आनंद व्यक्त केला. ऋषी ज्ञानेश्वर महाराज सामदा कशिपुर येथील महर्षि वाल्मिकी मठाची महती अयोध्या ट्रस्टीकडे सांगणार आहेत.

# किरण नगर नंबर १, गल्ली नंबर ७ व ८ मध्ये स्थानिक नागरिकांच्या हस्ते नाली बांधकामाचे भूमिपूजन

**दि.२०विदर्भ प्रजासत्ताक अमरावती**

गेल्या अनेक वर्षापासून प्रतीक्षेत असलेल्या किरण नगर १ मधील गल्ली नं.७ व ८ मधील नालीच्या बांधकामाचे भूमिपूजन अखेर स्थानिक नागरिकांच्या हस्ते शुक्रवारला सकाळी पार पडले. विशेष म्हणजे स्थानिक नागरिकांनी या कामाबाबत थेट मनपा आयुक्तांकडे निवेदन सादर केल्यानंतर त्याची तत्काळ दखल घेत मंजुरी दिली. त्यानंतर स्थानिक महिला,नागरिकांच्या हस्ते कामाचे भूमिपूजन करून आजच शुभारंभ झाला.

किरण नगर नंबर १ मध्ये गल्ली नंबर ७ व ८ येथील नागरिकांना सर्विस लाईन मधील तुटलेल्या नालीमुळे दुर्गंधी व घाणीच्या साम्राज्याचा सामना करावा लागत होता. त्यामुळे नागरिकांनी मनपा आयुक्त देविदास पवार यांच्याकडे निवेदन सादर करूधन तुटलेल्या नालीचे



बांधकाम करण्याची विनंती केली. आयुक्तंनी या निवेदनाची दखल घेत बांधकाम विभागाला त्वरित निर्देश देत बांधकाम विभागाला सदर कामाचे इस्टिमेट बनवून त्वरित काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार शुक्रवार १८ जानेवारी सकाळी दहा वाजता गल्ली नंबर ७ व गल्ली नंबर ८ या रोकडे ते जळीत सर्विस लाईनचे बांधकाम भूमिपूजन नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जेष्ठ नागरिक श्रीरंग पडसोकर ,देवराव गाढवे ,सतीश गाले ,एम एस कोष्टी आदी मान्यवरांच्या हस्चे श्रीफळ फोडून व कुदळी मारून करण्यात आले. यावेळी किरण नगर मधील पप्पू आवारे ,प्रवीण गाढवे ,अमोल देशमुख,प्रमोद भुजाडे, रत्नाकर बानुमाकोडे, गजेंद्र पुरी,आनंदा पाटिल, मनीष काळे ,उमेकर काका, गजानन बानुमाकोडे, सुधीर घुमटकर,मनोज आवारे, बाळू ठवळी,वाईनदेशकर काका ,धानोरकर काका ,प्रदीप लागपूरकर , शिवालाल क्षिरसागर , कुंभलकर काका, सुनिता आवारे ,कांचन देशमुख ,छाया धानोरकर, जंगम काकू ,खंडारे काकू, घुरटकर काकू , कोष्टी काकू, नगराळे काकू यांच्यासह मनपाचे झोन क्रमांक ३ चे उपअभियंता नितीन बोबडे ,अभियंता नितीन भटकर ,अभियंता चैतन्य काळे यांच्यासह किरण नगर गल्ली नंबर ८ व ७ मधील असंख्य नागरी महिला मंडळी यावेळी उपस्थित होते.

# जुळून आला योगायोग
## राममय वातावरणात लग्नाचा बार

अरुण जोशी

दि.२०विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती

आपले लग्न कुणा विशेष महत्त्वाच्या दिवशी व्हावे, अशी इच्छा वर- वधू आणि त्यांच्या घरच्या दोन्ही पक्षांकडील मंडळींची असते. लग्नाची तिथी काढताना तशा प्रयत्नात ते असतात. अशी मनोमन इच्छा बाळगणाऱ्या वर आणि वधू यांच्या लग्नाची तारीख या आठवड्यात १८ ते २२ जानेवारी यादरम्यान असेल आणि संबंधित कुटुंबीय धार्मिक वृत्तीचे व विषेश शुभ दिनाला मानणारे असतील, त्यांच्या लग्नाचा दिवस अत्यंत आनंदाचा, कायम लक्षात ठरणारा असणार आहे.



त्याचे कारण, अयोध्येत नवनिर्मित मंदिरात श्रीरामाच्या मूर्तीची होत असलेली प्राणप्रतिष्ठा आणि त्यानिमित्त देशभरात पसरून असलेले राममय वातावरण, हे होय! आणि नेमकेयाच आठवड्यात बरेच ठिकाणी लग्नकार्य होत आहेत. हे येथे उल्लेखनीय!

लग्न जुळले, साक्षगंध उरकले की, शुभ मुहूर्त तसेच सर्व सोय बघून लग्नाची तारीख, ठरलेल्या लग्न तारखेच्या साधारणपणे तीन- चार महिन्यांपूर्वी काढली जाते. यंदा, तीन- चार महिन्यांपूर्वी ती ठरविताना २२ जानेवारीला अयोध्या येथील नवनिर्मित श्रीराम मंदिरात मूर्तीची प्रतिष्ठापना होईल व त्यानिमित्त सर्वत्र राममयवातावरण व जल्लोष असणार, याची कोणीच कल्पना केली नव्हती. मात्र, आता योगायोग असा जुळून आला आहे की, नेमके त्याच तारखेला २२ जानेवारी वा त्याला धरून, एक- दोन दिवस मागे पुढे अनेक ठिकाणी लग्नकार्य होणार आहेत.

**अनेकजण अडकणार लग्नबंधणात**

अनेकांच्या लग्नाच्या गाठी या उत्सवात बांधल्या जात आहेत. यालाच म्हणतात, न मांगे मोती मिले ! त्याचप्रमाणे आपले नूतन बाळ २२ जानेवारीलाच जन्माला यावे, अशीही काही गरोदर मातांची इच्छा असणार! तद्ववतच नवीन वाहने खरेदी करणारेही नेमके याच तारखेला आपली वाहने घेण्याच्या प्रयत्नात आहेत. रामनामाचे महात्म्यच तसेआहे.

# शेतात उभारली मचाण; रात्रीला करावे लागते जागरण
## वन्यप्राण्यांपासून पीक संरक्षणार्थ शेतकऱ्यांची धडपड

दि.२०विदर्भ प्रजासत्ताक
चांदुर बाजार

शेतशिवारात रब्बी हंगामात शेतकऱ्यांनी विविध धान्य, कडधान्य पिकांची लागवड केली आहे. वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्याकरिता बहुसंख्य शेतकरी रात्रीच्या सुमारास शेतातील मचाणीवर चढून आपल्या शेतात जागल करीत पिकांचे रक्षण करीत आहेत. शेतशिवारात ठिकठिकाणी मचाण तयार केलेल्या आहेत. वेळप्रसंगी स्वतःचा जिवाची पर्वा न करता शेतपिकांच्या रक्षणासाठी शेतकरी वर्ग ऐन थंडीतही अख्खी रात्र शेतात जागत करीत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

जिल्ह्यातील चांदुर बाजार,मोर्शी,वरुड, दर्यापूर शेतशिवारात रब्बी हंगामातमोठ्या प्रमाणात सर्वत्र रब्बी पिकांची लागवड करून उत्पादन घेतले जाते.

सध्या रब्बी पिके बहरली असून हिरवीगार दिसू लागली आहेत. अनेक तालुक्यात शेतशिवारालगत



चहूबाजूंनीजंगलव्याप्त परिसर असल्याने वन्यप्राण्यांचा मुक्त संसार आहे. वन्यप्राण्यांपासून होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतकरी रात्रीचा दिवस करीत आहेत.

वन्यप्राण्यांनी शेतातील रब्बी पिकांचे नुकसान करू नये म्हणून शेतकऱ्यांची धडपड सुरू आहे.रानडुकरांच्या हल्ल्यापासून संरक्षण म्हणून शेतात राखण करणाऱ्या शेतकऱ्यांना उंचावर मचाण अर्थात 'मळा' करून राहावे लागत आहे.बहुसंख्य शेतकऱ्यांनी पावसाळ्यात खरीप हंगामात धुऱ्यावर तूर पिकाची लागवड केलेली आहे. आता रब्बी हंगामातील बहरलेली काही पिके फुलोऱ्यावर आहेत. सद्य:स्थितीत तूर पिकाला मोठ्या प्रमाणात शेंगाही धरू लागल्या आहेत. मात्र, रात्रीला रानटी प्राणी शेतात शिरून धुऱ्यावरील तूर पिकाचे नुकसान करीत असल्याचे शेतकरी सांगत आहेत.

### पीक संरक्षणासाठी साड्यांचेही कुंपण

दिवसा माकडे व रात्रीच्या सुमारास रानडुकरे, हरीण व अन्य प्राण्यांच्या हैदोसामुळे ग्रामीण भागातील शेतकरी त्रस्त झाले आहेत. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून रानडुकरांना घाबरविण्यासाठी काही शेतकऱ्यांनी आपल्या शेतातसभोवती रंगीबेरंगी साड्यांचे कुंपण केल्याचे दिसते.

### वन्यप्राण्यांचा बंदोबस्त व्हावा

दरवर्षीच रानटी डुकरे खरीप हंगामातील हातातोंडाशी आलेले धान पीक उद्ध्वस्त करून मातीमोल करीत असतात. परिणामी, शेतकऱ्यांना नुकसानीला सामोरे जावे लागते. मात्र, आता रानटी प्राण्यांपासून रब्बी पिकांचा बचाव करण्यासाठी शेतकऱ्यांना कसरत करावी लागत आहे. वन विभागाने पुढाकार घेत वन्यप्राण्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

# घर खरेदी करा बिनधास्त; नोंदणीआधी 'महारेरा' करेल कागदपत्रांची छाननी
## शासनाचे नवे धोरण : घर व फ्लॅट खरेदीच्या व्यवहारात येईल पारदर्शकपणा

दि.२०विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती

अलीकडे रिअल इस्टेटच्या खरेदी-विक्री तसेच इतर मालमत्ता व्यवहार वाढले आहेत. मात्र, अनेकदा हे व्यवहार करताना ग्राहकांची फसवणूक होते. त्यामुळे शासनाने अशा व्यवहारात महारेराकडे नोंदणी करणे आवश्यक केले आहे. नोंदणी केल्यानंतर व त्यापूर्वीसुद्धा महारेरा कागदपत्रांची छाननी करणार आहे. त्यामुळे फसवणुकीच्या प्रकाराला




आळा बसणार आहे. याबाबत नागरिकांनी जागरूक राहण्याची आवश्यकता आहे.महारेराच्या माध्यमातून घराची व दस्तावेजाची पाहणी करून खरेदी- विक्री व्यवहार पूर्ण केल्यास .. कोणाचीही फसवणूक होणार नाही, असे शासनाने म्हटले आहे.

**कागदपत्रे सादर केल्यानंतरच मिळणार नोंदणी क्रमांक**

संबंधित भूखंड किंवा घर खरेदी करण्या- बाबत आवश्यक ती कागदपत्रे सादर केल्यानंतर महारेराकडून संबंधिताला नोंदणी क्रमांक प्राप्त होईल. त्यानंतरच खरेदी- विक्रीचे व्यवहार पूर्ण होतील. महानगरपालिका क्षेत्रात अलीकडे फसव- णुकीचे प्रकार वाढल्याने शासनाने हा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

**ब्रोकरची चाचपणी आवश्यक**

अलीकडे भूखंड व घर खरेदी- विक्रीच्या व्यवहारात अनेक ब्रोकर उतरले आहेत. अधिकाधिक कमिशन कमाविण्याच्या उद्देशाने काही जण ग्राहकांना खोटी माहिती देऊन खरेदी- विक्रीचे व्यवहार पूर्ण करून घेतात. त्यानंतर पश्चात्तापाची वेळ येते.

# पाच लाख कुटुंबाला 'आनंदाचा शिधा'; २२ जानेवारीपासून प्रारंभ
## श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा ते शिवजयंतीपर्यंत होणार वितरण

दि.२०विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती

जिल्ह्यातील पाच लाख ५५ हजार २०७ कुटुंबाला दि. २२ जानेवारीपासून आनंदाचा शिधा वितरित होणार आहे. श्रीराम मंदिरातील प्राणप्रतिष्ठा ते शिवजयंतीपर्यंत हा शिधा प्रत्येकाला मिळणार आहे.

गुढीपाडवा ते दि, १४ एप्रिल आणि त्यानंतर दसरा ते दिवाळी या कालावधीत राज्य शासनाने सर्वसामान्य नागरिकांसाठी आनंदाचा शिधा वितरित करण्याचा निर्णय घेतला होता. आता नव्याने अयोध्येतील राममंदिराच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्ताने आनंदाचा शिधा वितरित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्या अनुषंगाने पुरवठा विभागाची यंत्रणा पुन्हा नव्याने सज्ज झाली आहे.




यावेळी या शिधा कीटमध्ये एक किलो साखर, एक किलो पामतेल, अर्धा किलो पोहे, अर्धा किलो मैदा, अर्धा किलो रवा, अर्धा किलो चनादाळ या वस्तू दिल्या जाणार आहेत.

१०० रुपयांमध्ये सहा प्रकारच्या शिधा जिन्नस स्वस्त धान्य प्र दुकानदारांकडून ग्राहकांना वितरित केला जाणार आहे. हा शिधा सध्या दुकानांमध्ये पोहोचायचा असला तरी दि. २२ जानेवारीपासून त्याचे वितरण सुरू होणार आहे. यासाठी पुरवठादार यंत्रणेला तशा सूचनाही देण्यात आलेल्या आहे.

यामध्ये सर्वच ग्राहकांना सहभागी करण्यात येणार आहे. त्यामध्ये एपीएल ग्राहक, अंत्योदय कार्डधारक आणि प्राधान्य गटातील कुटुंबाचा समावेश त असणार आहे.स्वस्त धान्य दुकानातून शेतकऱ्यांना धान्याऐवजी पैसे खात्यात जमा करण्यात येत होते. मात्र, आनंदा शिधा कीट वितरित करताना ही शिधा कीट शेतकरी कार्डधारकांना देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. प्रभू रामचंद्रांच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा आनंद घराघरात साजरा करता यावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे घरोघरी दीपोत्सव साजरा होणार आहे.

### किटसोबतच स्वस्त धान्यदेखील वितरित होणार

२२ जानेवारी ते शिव जयंतीपर्यंत आनंदोत्सव साजरा करण्यासाठी आनंदाचा शिधा दिला जात आहे. यासोबतच नियमितपणे वितरित होणारे मोफत धान्यदेखील दिले जाणार आहे. यामुळे सर्वसामान्य कुटुंबातील अन्नधान्याचा प्रश्न सुद्धा निकाली निघणार आहे.

# तीन तालुक्यात होणार ६० हजार घरात श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन
## आ.प्रताप अडसड यांनी दिल्या प्रतिमा : दोनशे काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

दि.२०विदर्भ प्रजासत्ताक
धामणगाव रेल्वे

अयोध्येतील श्रीरामाच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्या निमित्त तीन तालुक्यात ६० हजार कुटुंबाच्या घरी श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन होणार असून २२ पंचायत समिती सर्कल मधील मेळाव्यातून आमदार प्रताप अडसड यांनी श्रीरामाच्या प्रतिमा दिल्या आहेतराम लल्लाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा २२ जानेवारी रोजी अयोध्येत होत आहे त्यानिमित्त धामणगाव रेल्वे चांदुर रेल्वे नांदगाव खंडेश्वर या तालुक्यात जय्यत तयारी सुरू आहे तालुक्यातील कावली , मंगरूळ दस्तगीर, अंजनसिंगी, जुना धामणगाव, चिंचोली,



तळेगाव दशासर सोनेगाव खर्डा ,राजुरा , पळसखेड सातेफळ, आमला विश्वेश्वर, सालोड, कोहळा जटेश्वर, लोणी, येवती ,धानोरा गुरव जमुना या गावात भाजपाच्या वतीने मेळावे घेण्यात आले आहे यात श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन प्रतिमा आमदार प्रताप अडसड यांच्या हस्ते देण्यात आले आहे २२ जानेवारी रोजी प्रत्येकाच्या घरी श्रीरामाच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येणार आहेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून चार दिवस राबविण्यात येणाऱ्या स्वच्छता मोहिमेअंतर्गत आमदार प्रताप अडसड यांनी संत गजानन महाराज , साई बाबा, मातादी व विविध संतांच्या मंदिरात जाऊन परीसरात स्वच्छता अभियान राबविले शिवाजी महाराज , भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, भगवान गौतम बुद्ध, महात्मा फुले यांच्या पुतळा परिसराची स्वच्छता करून पूजन केले

**२०० काँग्रेस कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश**

आमदार प्रताप अडसड हे यांनी मतदारसंघा चां चौफेर विकास करीत असल्याने धामणगाव तालुका काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष रवीश बिरे, उसळगव्हाण येथील उपसरपंच स्वप्निल रोघे यांच्यासह धानोरा म्हाली, जडका जगताप, मंगरूळ दस्तगीर ,कावली, लोणी टाकळी, हिंगलासपुर, आमला विश्वेश्वर येथील काँग्रेस कार्यकर्ते तसेच, कोहळा जटेश्वरर येथील मुस्लिम बांधवांनी तिन्ही तालुक्यातील मेळाव्यात भाजपात प्रवेश केला.

# इंडिया आघाडीच्या जागावाटपाची तारीख ठरली

दि.२०विदर्भ प्रजासत्ताक
मुंबई

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी आता काही महिन्यांचाच कालावधील शिल्लक उरला आहे. मे महिन्याच्या अखेरीस भारतात लोकसभेच्या निवडणुका होऊ शकतात, असा अंदाज राजकीय विश्लेषकांनी बांधला आहे.

त्यामुळे येत्या निवडणुकीत केंद्रातील मोदी सरकारला पराभूत करण्यासाठी विरोधकांनी इंडिया आघाडीची मोट बांधली आहे. दरम्यान, इंडिया आघाडीच्या जागावाटपाची तारीख ठरल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज दिली.जयंत पाटील यांनी आज मुंबईत माध्यमांसोबत संवाद साधला. यावेळी त्यांनी इंडिया आघाडीच्या जागावाटपाबाबत माहिती दिली. येत्या दोन ते तीन दिवसांत जागावाटपाबाबत आमची बैठक होमार असून २५ जानेवारीपर्यंत जागावाटपाचा फॉर्म्युला ठरेल, असं जयंत पाटील यांनी सांगितलं आहे.

# ध्वजाचे दुप्पट वाढले भाव; तरीही विक्री जोरात : मुंबई, सुरत येथून ५ लाख ध्वज जिल्ह्यात

दि.२०विदर्भ प्रजासत्ताक
अमरावती

२२ जानेवारीला अयोध्येत प्राणप्रतिष्ठा महोत्सव साजरा होत आहे. या धार्मिक सोहळ्याला अविस्मरणीय बनविण्यासाठी जिल्ह्यात भाविकांकडून घरांवर श्रीरामाचा भगवा ध्वज लावण्यात येणार आहे, याकरिता व्यापाऱ्यांनी जोरदार तयारी केली असून, सुरत व मुंबई या महानगरातून सुमारे पाच लाख ध्वज जिल्ह्यात विक्रीसाठी आणण्यात आल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली आहे.

ध्वजावर श्रीराम, मंदिराचे चित्र मुंबई, सुरत येथून प्रिंट करून आलेल्या भगव्या ध्वजावर धनुर्धारी प्रभू श्रीरामचंद्र व पाठीमागील बाजूस अयोध्येतील मंदिराचा फोटो छापण्यात आला आहे. अशा ध्वजांना मोठी मागणी आहे. येत्या दोन दिवसांत आणखी मागणीत वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे काही विक्रेत्यांनी






रस्त्यावरही दुकाने थाटली असल्याचे दिसून येते. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यासाठी भाविकांनी तयारी केल्याचे चित्र आहे.अयोध्या येथे श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त यंदा प्रथमच भगव्या ध्वजांची विक्री वाढली आहे. ध्वजांच्या मागणीपेक्षा पुरवठा कमी असल्यामुळे ध्वजाच्या किमतींत किंचित वाढ झाली आहे. ध्वजासोबतच टोपी, दुपट्टे, शर्टच्या विक्रीत वाढ झाली आहे. शहरातील भाविकांकडून ध्वजांना चांगली मागणी होत आहे.

**विविध प्रकारचे ध्वज...**

बाजारात उपलब्ध असलेल्या ध्वजांमध्ये २० बाय ३० इंच, ३० बाय ४५ इंच, ४० बाय ६० इंच व ६० बाय १० इंच असे चार प्रकार आहेत. शहरात शेकडो विक्रेते ध्वज विकत आहेत. याशिवाय शहरातून जिल्हाभरात ध्यज विक्रीला गेले आहेत.

**भगव्या टोप्या, दुपट्ट्यांची मागणी**

श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त गावातील मंदिरालाच अयोध्या तीर्थाचा दर्जा देण्यात येत आहे. खूप दिवस आधीपासूनच स्वच्छता आणि इतर धार्मिक उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यामुळे भगव्या टोप्या, दुपट्टे, रुमाल आणि पूजा साहित्याच्या विक्रीतही वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले.